- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २८६ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५२,७०० /-
- २३ कॅरेट : १,५०,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

# सीजेपीच्या 'रडार'वर ज्ञानेश कुमार

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह दिपके यांच्या ३ नव्या मागण्या

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

निवडणूक आयोगाच्या कारभारावरून राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा मोठा वाद पेटला आहे. कॉक्रोच जनता पार्टीचे अध्यक्ष आणि संस्थापक अभिजीत दिपके यांनी थेट मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ज्ञानेश कुमार हे देशातील सर्वांत मोठे देशद्रोही असून त्यांनी लोकशाही धोक्यात आणली आहे असा गंभीर आरोप करत दिपके यांनी त्यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी केली आहे. पुढील ४८ तासांत राजीनामा न दिल्यास देशभरात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.





केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि त्यांचे सहकारी आयुक्त सुखबीरसिंग संधू व विवेक जोशी यांच्यातील अंतर्गत मतभेदांमुळे नवा वाद निर्माण झाला आहे. गेल्या दहा महिन्यांत दोन्ही आयुक्तांनी ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयांवर तब्बल १४ वेळा लेखी आक्षेप नोंदवले आहेत. नवीन मतदारांची नोंदणी, मतदार यादीतून नावे वगळणे आणि ती पुन्हा समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेवर तसेच रकफ मुद्द्यावरून फॉर्म-६ मधील सुधारणांवर विरोध दर्शवण्यात आला आहे.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स (ट्विटर) वर पोस्ट करत अभिजित दिपके यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर टीका केली. ज्ञानेश कुमार मुख्य निवडणूक आयुक्त झाल्यापासून देशात कोणी मतदान करायचे आणि कोणी नाही, हे ते स्वतः ठरवत आहेत. ही कसली लोकशाही? त्यांनी संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच कोलमडवून टाकली आहे असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

**सीजेपीच्या ३ प्रमुख मागण्या काय आहेत?**

आपल्या पोस्टमध्ये अभिजीत दिपके यांनी केवळ राजीनाम्याचीच नव्हे, तर निवडणूक आयोगात पारदर्शकता आणण्यासाठी तीन मोठ्या मागण्याही मांडल्या आहेत.

**१. गुन्हेगारी कारवाई आणि चौकशी**

ज्ञानेश कुमार यांच्यावर तात्काळ गुन्हेगारी खटला दाखल करण्यात यावा. तसेच त्यांना हे सर्व करण्याचे आदेश नेमके कोणाकडून मिळत होते? याचा खुलासा जनतेसमोर झाला पाहिजे.

**२. आगामी निवडणुकांना स्थगिती**

आगामी सर्व निवडणुका तातडीने स्थगित करण्यात याव्यात. तसेच मतदार याद्यांमधील बदल रोखून जानेवारी २०२५ ची मूळ मतदार यादी पुनरुज्जीवित करावी. या प्रक्रियेतील सर्व कागदपत्रे आणि फाईल्स सर्वोच्च न्यायालयाने स्वतःच्या ताब्यात घ्याव्यात, जेणेकरून पुरावे नष्ट किंवा बदलले जाणार नाहीत.

**३. नवा कायदा लागू करावा**

२०२३ मध्ये झालेला निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीचा कायदा रद्द करण्यात यावा. नागरी समाजातील प्रतिनिधींचा सहभाग असलेला आणि जनतेचा विश्वास निर्माण करेल असा नवीन कायदा अमलात आणावा.

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांच्या अडचणी वाढणार? कोल्हापुरातून पहिले आव्हान, खंडपीठात याचिका दाखल

निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवरून देशात राजकीय वातावरण तापलेले असतानाच आता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अडचणीत मोठी भर पडली आहे. ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेले काही महत्त्वाचे निर्णय आणि प्रशासकीय प्रक्रियांना थेट आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात दाखल करण्यात आली आहे. ही महत्त्वपूर्ण याचिका प्रथमेश गोपाळ गवाणकर, गौरव सूर्यकांत नाखरेकर, आदेश शशिकांत भाटकर आणि स्मिताली निलेश नार्वेकर यांनी दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांच्या बाजूने प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ अँड. असीम सरोदे यांच्यासह वकिलांचे पथक न्यायालयात बाजू मांडत आहे.

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

**थोडक्यात**

## महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर

**पाटना :** जमुई येथील दहावीच्या विद्यार्थिनीच्या छेडछाडीची घटना ताजी असतानाच आता बिहारमधील समस्तीपूर मधूनही अशीच एक संतापजनक घटना समोर आली आहे. समस्तीपूर येथे भररस्त्यात एका तरुणीसोबत गैरवर्तन केल्याचा व्हीडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला असून, या घटनेमुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. तसेच राज्यातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून तीव्र संताप व्यक्त करत थेट भाजप सरकारवर हल्लाबोल केला आहे. व्हायरल झालेल्या व्हीडीओचा संदर्भ देत तेजस्वी यादव यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, समस्तीपूरमध्ये अल्पवयीन मुलीची सर्वांसमोर काही तरुणांनी केलेली छेडछाड हा थेट पुरावा आहे की, भाजपशासित बिहारमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. राज्यातील सत्तेतील निर्लज्ज मंत्री नेहमीप्रमाणे या घटनेलाही किरकोळ घटना म्हणून संबोधून हात झटकून मोकळे होतील, असा टोलाही त्यांनी लगावला.



## दिवाळीनंतर राज्य मंत्रिमंडळात फेरबदल? अकार्यक्षम मंत्र्यांना डच्चू मिळणार

**वृत्तसंस्था, जळगाव**

महायुती सरकारमध्ये मंत्रिमंडळ फेरबदलाची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. शिवसेनेचे आमदार बच्चू कडू यांनी दिवाळीच्या काळात किंवा दिवाळीनंतर राज्य मंत्रिमंडळात मोठा फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. सरकार स्थापनेच्या वेळी मुख्यमंत्र्यांनी अडीच-अडीच वर्षांचा शब्द दिला होता आणि आता त्याची वेळ आली असल्याचे कडू यांनी म्हटले.

जळगाव दौऱ्यावर असताना प्रसारमाध्यमांशी बोलताना कडू यांनी मंत्रिमंडळ विस्ताराबाबत भाष्य केले. दिवाळीच्या काळात किंवा दिवाळी संपताच राज्यात मंत्रिमंडळ विस्तार आणि मोठा फेरबदल होण्याची दाट शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. सत्तावाटपाच्या वेळी मुख्यमंत्र्यांनी अडीच-अडीच वर्षांचा शब्द दिला होता, आता ती वेळ आली आहे, असा दावा त्यांनी केला.

पाचोरा-भडगाव मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार किशोर पाटील यांना मंत्रिमंडळात स्थान देण्याची मागणीही कडू यांनी केली. पाटील हे सलग तीन वेळा आमदार झाले असून, त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळावे, अशी मतदारसंघातील जनता आणि कार्यकर्त्यांची अपेक्षा असल्याचे कडू म्हणाले.

## ज्येष्ठ अभिनेते मुश्ताक खान यांचे निधन

**वृत्तसंस्था, मुंबई**

बॉलिवूड चित्रपटसृष्टीतून अत्यंत दुःखाद बातमी समोर आली आहे. 'वेलकम' चित्रपटातील 'मेरी एक टांग नकली है...' हा गाजलेला डायलॉग आणि आपल्या अफलातून कॉमिक टायमिंगने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारे ज्येष्ठ अभिनेते मुश्ताक खान यांचे निधन झाले आहे. वयाच्या ५६ व्या वर्षी त्यांनी गुरुवारी सायंकाळी अखेरचा श्वास घेतला.

ते गेल्या काही काळापासून लिव्हर कॅन्सरशी झुंज देत होते.



मुश्ताक खान यांच्या निधनाची माहिती त्यांचे बिझनेस पार्टनर शिवम यांनी दिली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुश्ताक खान गेल्या १५ दिवसांपासून रुग्णालयात दाखल होते. त्यांना आधी फुफ्फुसाचा कर्करोग झाला होता, ज्यावर उपचार घेतल्यानंतर ते पूर्णपणे ठीक झाले होते. मात्र, ८ दिवसांपूर्वी कर्करोग पुन्हा उफाळून आला आणि त्यांची प्रकृती चिंताजनक बनली. डॉक्टरांच्या मते त्यांचा कर्करोग अंतिम टप्प्यात पोहोचला होता. गुरुवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. आपल्या सहजसुंदर अभिनयाने आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणाऱ्या मुश्ताक खान यांच्या जाण्याने बॉलिवूडमधील एका अष्टपैलू कलाकाराचा अंत झाला आहे.

## कॉँग्रेस मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना घेरणार

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत आणि विरोधकांच्या निशाण्यावर आहेत. निवडणूक आयोगाच्या कामकाजावरील एका अहवालानुसार, गेल्या १० महिन्यांत दोन निवडणूक आयुक्तांनी एसआयआर आणि निवडणूक आयोगाच्या काही प्रक्रियांबाबत सुमारे १४ वेळा गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. यावरून आता नवा वाद सुरू झाला असून काँग्रेसने ज्ञानेश कुमार यांना घेरण्याची तयारी सुरू केली आहे.

निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबतच्या एका अहवालामुळे राजकीय वाद निर्माण झाला आहे. त्यानुसार, गेल्या १० महिन्यांत दोन निवडणूक आयुक्तांनी सुमारे १४ वेळा गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. काँग्रेसने आता या मुद्द्यावर २९ सप्टेंबर रोजी केंद्रीय कार्यकारिणी समितीची बैठक बोलावण्याचा निर्णय घेतला आहे. या अहवालामुळे आणि आयोगातील फुटीमुळे



विरोधी पक्ष निवडणूक आयोगावर, विशेषतः ज्ञानेश कुमार यांच्यावर आणि सत्ताधारी पक्षावर हल्लाबोल करत आहे. या संदर्भात, काँग्रेसने एक मोठा निर्णय घेतला आहे. काँग्रेसने आता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा मुद्दा अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे.

काँग्रेसची सर्वात शक्तिशाली समिती, सीडब्ल्यूसी ची बैठक २९ सप्टेंबर रोजी बोलावण्यात आली आहे. असे मानले जाते की, काँग्रेस या बैठकीत ज्ञानेश कुमार यांच्याबाबत एक ठराव मांडू शकते. तथापि, त्याआधी, राहुल गांधी या मुद्यावर एक पत्रकार परिषद घेणार आहेत. राहुल गांधी यांनी काल या विषयावर पोस्ट केली. त्यात त्यांनी लिहिले, मतचोरी हा देशातील लोकांविरुद्धचा गुन्हा आहे. हा संविधानावरील थेट हल्ला आहे. भाजप, आरएसएस आणि निवडणूक आयोगाने देशद्रोह केला आहे. न्याय मिळेल.

दरम्यान, काँग्रेस नेते कपिल सिबल म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल घ्यावी आणि संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी. काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यशैलीला दीर्घकाळापासून विरोध केला आहे. विविध राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये गैरप्रकार झाल्याचे आरोप करण्यात आले असून, याला मतचोरी म्हटले जात आहे. ज्ञानेश कुमार सरकारच्या सांगण्यावरून काम करतात, असा आरोपही ते सातत्याने करतात. त्यामुळे आता काँग्रेस हा मुद्दा लावून धरणार आहे.

फौजदारी खटला चालवा : खा. प्रियंका गांधी मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयटी) प्रक्रियेत कोणतेही बेकायदेशीर प्रकार झाले असतील तर त्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींविरोधात, मुख्य निवडणूक आयुक्तांसह, फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधी वाड्रा यांनी केली. केरळमधील कल्पेट्टा येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी एसआयआर प्रक्रियेवरून निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली.

निवडणुकीच्या लोकशाही प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा कोणताही प्रयत्न हा संविधान आणि देशाविरोधातील गंभीर अपराध असल्याचे प्रियंका गांधी यांनी म्हटले. जो कोणी निवडणुकीच्या लोकशाही प्रक्रियेशी छेडछाड करतो, तो देशाविरोधात गंभीर कृत्य करत आहे अशी भूमिका त्यांनी मांडली.

## दुष्काळजन्य उपाययोजनांसाठी महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन

### नऊ कॅबिनेट मंत्र्यांसह मुख्य सचिवांचा समितीत सहभाग, जिल्हानिहाय पाहणी करणार, दर आठवड्याला बैठक घेऊन पंचनामे, चारा, पाणी, मदतीची शिफारस

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि तातडीने उपाययोजना आखण्यासाठी राज्य शासनाने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार या समितीमध्ये नऊ मंत्र्यांचा समावेश असून मुख्य सचिव हे समिती सदस्य आहेत.

समितीच्या माध्यमातून टंचाईग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकरी आणि ग्रामस्थांना तातडीने मदत पुरवली जाणार आहे.

२२ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाने २३ सप्टेंबर २०२६ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार राज्यातील दुष्काळ, पाणी टंचाई आणि चारा टंचाईवर सतत लक्ष ठेवून योग्य ते निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार या उपसमितीला देण्यात आले आहेत.

**उपसमितीत 'या' ९ मंत्र्यांचा समावेश**

या समितीमध्ये महसूलमंत्र्यांसोबतच विविध ९ महत्त्वाच्या खात्यांच्या मंत्र्यांना सदस्य म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

- गिरीश महाजन - जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री
- गुलाबराव पाटील - पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री
- संजय राठोड - मृद व जलसंधारण मंत्री
- पंकजा मुंडे - पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री
- दत्तात्रय भरणे - कृषी मंत्री
- जयकुमार गोरे - ग्राम विकास मंत्री
- प्रताप सरनाईक - परिवहन मंत्री
- मकरंद पाटील - मदत व पुनर्वसन मंत्री
- बाबासाहेब पाटील - सहकार मंत्री

**उपसमितीची प्रमुख कामे आणि जबाबदाऱ्या**

दर आठवड्याला आढावा बैठक : प्रत्यक्ष बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी करणे आणि दर आठवड्याला बैठक घेऊन दुष्काळाचा संपूर्ण अहवाल मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना सादर करणे.

पिकांच्या नुकसानीचे पंचनामे : शेतातील पिकांच्या नुकसानीच्या पंचनाम्यांचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीबाबत शिफारसी करणे.

पाण्याचे नियोजन : प्रत्येक जिल्ह्यातील उपलब्ध पाण्याचा साठा विचारात घेऊन पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे.

जनावरांच्या चाऱ्याची सोय : जिल्ह्यातील जनावरांची संख्या लक्षात घेऊन चाऱ्याची कमतरता भासू नये म्हणून योग्य त्या उपाययोजना करणे.

तातडीचे निर्णय : परिस्थितीनुसार तातडीने घ्यावयाच्या महत्त्वाच्या निर्णयांबाबत राज्य मंत्रिमंडळाला शिफारस करणे. या सर्व बैठकांचे नियोजन आणि समन्वयाचे काम मदत व पुनर्वसन विभागामार्फत केले जाईल.

## कंपनीतील भींत कोसळून ३ कामगारांचा मृत्यू

**वृत्तसंस्था, पालघर**

एमआयडीसी असो किंवा इंडस्ट्रीज इस्टेट, येथील कंपन्यांमध्ये काम करत असताना कामगारांची सुरक्षा अतिशय महत्त्वाची असते. कामगारांच्या सुरक्षेचे नियम पाळणे कंपनीला बंधनकारक असते. मात्र, तरीही कधी कधी अपघाताच्या घटना घडतात. पालघर जिल्ह्याच्या वाडा तालुक्यातील पाली पोशेरी येथील कंपनीत दुर्घटना. कंपनीतील भिंत कोसळून तीन कामगारांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. या घटनेनं कंपनी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, बार्शी तालुक्यातील वैराग येथे देखील दोन दिवसांपूर्वी घराची भींत कोसळून २ महिलांचा मृत्यू झाला होता.

पालघर जिल्ह्याच्या वाडा येथील पोशेरीत टीना रबर कारखान्यात अपघाताची दुर्घटना घडली असून मृतांमध्ये दोन महिला तर एका पुरुषाचा समावेश आहे. केशव गुणगुणा, रंजना कोंब आणि मीरा गवळी अशी मृत व्यक्तींची नावे आहेत. या घटनेनंतर वाडा पोलीस घटनास्थळी दाखल झाल असून संबंधित घटनेचा तपास करत आहेत. मात्र, या दुर्घटनेमुळे, पालघर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रांमधील कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

**बार्शीत भींत कोसळून दोन महिला ठार**

बार्शी तालुक्यातील वैरागमध्येही दोन दिवसांपूर्वीच अशीच एक दुर्दैवी घटना घडली होती. कमकुवत झालेल्या घराची भिंत अचानक कोसळून मावशी-भाचीचा मृत्यू झाला आहे. वैरागमधील खेंदाड गल्लीमध्ये पहाटे साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. मीनल गुलाब ठोंबरे आणि त्यांच्या मावशी सुमन महादेव पारदे या दोघी एका खोलीत झोपल्या असताना अचानक भिंत त्यांच्या अंगावर कोसळली. दोघींनाही ढिगाऱ्यातून बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

संपादकीय लेखणीतून...

# १९७२ नंतरची भीषणता

मराठवाड्यावर पुन्हा एकदा १९७२ च्या भीषण दुष्काळाचे सावट पसरले आहे. ऐन पावसाळ्यात राज्यातून पावसाने पूर्णपणे दडी मारल्यामुळे, विशेषतः मराठवाड्यात अत्यंत भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाने मान्सूनच्या सुरुवातीलाच वर्तवलेल्या अंदाजानुसार एल निनो प्रणाली सक्रिय झाल्याचा थेट फटका बसला असून, सरासरीपेक्षा अत्यंत कमी पाऊस झाला आहे. जलप्रकल्प व धरणांमधील पाणीसाठा वेगाने तळाला जात असल्याने बळिराजा हताशपणे आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.

मात्र, आकाशात पावसाचे ढग दिसत नाहीत. मराठवाड्यात तब्बल ५० दिवसांपासून समाधानकारक पाऊस न झाल्याने आगामी पाणीटंचाईचे आणि चाराटंचाईचे भयानक संकट उभे आहे. मराठवाडा विभागात आतापर्यंतच्या एकूण सरासरीच्या तुलनेत तब्बल १९९ मिमी पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे. विभागातील २७५ महसूल मंडळांमध्ये अत्यंत कमी पाऊस झाल्यामुळे हातात आलेली खरीप पिके पूर्णपणे वाळून जाण्याच्या मार्गावर आहेत, काही ठिकाणी गेली आहेत. सोयाबीन, कापूस, बाजरी आणि तूर यासारख्या मुख्य पिकांचे अतोनात नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पार कोलमडले आहे. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये पर्जन्यमानाची आकडेवारी वार्षिक सरासरीच्या तुलनेत कमी आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये ही टक्केवारी ७२.६० टक्के, जालना ७२.७१, बीड ५८.५२, लातूर ४९.८२,धाराशिव ५६.०३, नांदेड ७२.१८, परभणी ५५.२६ तर हिंगोलीमध्ये ६८.३३ टक्के आहे. पर्जन्यमानाची आकडेवारी पाहता लातूर जिल्ह्याला सर्वाधिक फटका बसल्याचे दिसून येते. येथे सरासरीच्या अर्धा पाऊसही झालेला नाही.

याशिवाय धाराशिव, परभणी आणि बीड जिल्ह्यांची स्थितीही कमालीची चिंताजनक आहे. पावसाच्या या मोठ्या तफावतीमुळे यंदा केवळ खरिपाचा हंगामच वाया गेलेला नाही, तर आगामी रबी हंगामावर आणि नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यावरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांवर परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांकडून नुकसानभरपाई आणि तातडीच्या मदतीची मागणी होत आहे. गत काही दिवसांपासून पावसाची परिस्थिती अनेक ठिकाणी चिंताजनक आहे. काही भागात अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम झाला आहे, तर काही ठिकाणी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे आहे. राज्य सरकारला आता कुठे जाग येत असल्याचे जाणवते आहे, तरीही अजून ते मुहूर्ताच्या शोधात आहेत असे दिसते. या साऱ्या पार्श्वभूमीवर सरकारकडून नुकसानीचा आढावा घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. तालुकास्तरावर पीक नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या पंचनाम्यातून नेमके किती नुकसान झाले आहे, कोणत्या भागातील किती क्षेत्र बाधित झाले आहे आणि शेतकऱ्यांना किती मदतीची गरज आहे, याचा अंदाज घेतला जाणार आहे. शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नुकसानग्रस्त भागाचा दौरा करण्याची सुबुद्धी झाली आहे.

केवळ प्रशासकीय पातळीवर अहवाल घेण्याऐवजी शेताच्या बांधावर जाऊन परिस्थिती समजून घेण्यावर भर दिला जाणार आहे. पिकांची सद्यस्थिती, पावसाअभावी झालेले नुकसान आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी याचा आढावा घेतला जाणार आहे. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. त्यामुळे आता पंचनाम्यांची प्रक्रिया किती वेगाने पूर्ण होते आणि त्यानंतर मदतीचे स्वरूप काय असेल याकडे लक्ष लागले आहे. १५ सप्टेंबरच्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील पावसाच्या स्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ५ ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे अधिकृत पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळी परिस्थितीचा अधिक व्यापक आढावा घेण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. आता समिती काय अहवाल देते ते पहायचे! सातारा, सातारा घाटमाथा, रायगड, सोलापूर, लातूर, नांदेड, गडचिरोली या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

# मंगलमूर्तीचे विसर्जन : एक आध्यात्मिक आणि सांस्कृतिक प्रवास

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनात गणेशोत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला घराघरांत आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये अत्यंत उत्साहात विराजमान झालेल्या लाडक्या गणरायाला दहा दिवसांच्या मनोभावे पूजेनंतर भाद्रपद शुद्ध चतुर्दशीला म्हणजेच अनंत चतुर्दशीच्या दिवशी निरोप दिला जातो. हा दिवस केवळ एका उत्सवाची सांगता नसून तो मानवी भावना, भक्ती आणि निसर्गाच्या चक्राचा एक अत्यंत सुरेख संगम आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी भगवान विष्णूच्या अनंत या रूपाचेही व्रत केले जाते. जीवनातील अनंत संकटांवर मात करण्यासाठी आणि सुख-समृद्धी प्राप्त करण्यासाठी हे व्रत आचरले जाते.

ज्या दिवशी विष्णूच्या या अनंत रूपाची पूजा होते, त्याच दिवशी गणांचा अधिपती असलेल्या गणरायाचे विसर्जन होणे, हा एक अनोखा आध्यात्मिक योग मानला जातो. दहा दिवस आपल्या घरातील एक सदस्य बनून राहिलेल्या बाप्पाला निरोप देताना प्रत्येक भक्ताचे मन हेलावून जाते आणि डोळ्यांच्या कडा ओलावतात.

गणेश विसर्जनाचा अर्थ केवळ मातीची मूर्ती पाण्यात विसर्जित करणे एवढाच मर्यादित नाही, तर त्यामागे भारतीय तत्त्वज्ञानातील अत्यंत सखोल आणि शाश्वत

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

विचार दडलेला आहे. हा विचार 'सगुणाकडून निर्गुणाकडे' जाण्याचा प्रवास उलगडतो. आपण निसर्गातून मिळणाऱ्या मातीपासून मूर्ती घडवतो, ती सगुण साकार मूर्ती देवघरात स्थापन करतो, तिची प्राणप्रतिष्ठा करून दहा दिवस तिची भक्ती करतो आणि शेवटी ती मूर्ती पुन्हा निसर्गाच्याच म्हणजेच पाण्याच्या स्वाधीन करतो. निर्मिती, स्थिती आणि लय हा निसर्गाचा आणि मानवी जीवनाचा अटळ नियम आहे, हेच या प्रक्रियेतून अधोरेखित होते. मानवी देह हादेखील पंचमहाभूतांपासून (पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश) बनलेला आहे आणि अंतिमतः तो याच निसर्गात विलीन होणार आहे, याची सतत जाणीव करून देणारा हा उत्सव आहे. विसर्जन ही संकल्पना आपल्याला खऱ्या अर्थाने 'मोहत्याग' आणि 'अलिप्तता' शिकवते. ज्या गोष्टीवर आपण जिवापाड प्रेम करतो, जिची आपण नितांत काळजी घेतो, योग्य वेळ आल्यावर तिला कसलाही मोह न ठेवता आनंदाने आणि कृतज्ञतेने निरोप देणे म्हणजेच खऱ्या अर्थाने विसर्जन होय.

बाह्य विसर्जनासोबतच आंतरिक विसर्जन हा या प्रक्रियेचा सर्वाधिक महत्त्वाचा पण अनेकदा दुर्लक्षित राहणारा पैलू आहे. केवळ मूर्ती पाण्यात विरघळली म्हणजे आपले कर्तव्य संपत नाही, तर त्यासोबत आपल्या आतील नकारात्मक भावनांचे, वाईट विचारांचे आणि दुर्गुणांचेही विसर्जन होणे अत्यंत गरजेचे आहे. गणपतीला आपण विघ्नहर्ता आणि बुद्धीचा देवता मानतो. त्यामुळे बाप्पाला निरोप देताना आपल्या प्रगतीत आणि समाजाच्या कल्याणात अडथळा ठरणारी आंतरिक विघ्नेही त्याच्यासोबत वाहून जाऊ देणे हाच यामागील खरा आध्यात्मिक हेतू आहे. माणसाच्या मनातील अहंकार, क्रोध, द्वेष, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षड्रिपूंचे विसर्जन करून, सर्वांशी प्रेमाने आणि नम्रतेने वागण्याची वृत्ती आपण अंगी बाणवली पाहिजे. मनातील अनाठायी भीती, नैराश्य, आळस आणि इतरांबद्दलचा दुस्वास कायमचा सोडून देऊन एका नव्या सकारात्मक, तेजस्वी आणि सात्त्विक ऊर्जेने आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. मूर्ती जशी संथपणे पाण्यात विरघळते, तसेच आपले सर्व दोष आणि अहंकारही विरघळून जावा आणि मागे केवळ एक शुद्ध, निर्मळ आणि आनंदी मन उरावे, हीच विघ्नहर्त्याची खरी भक्ती आहे.

आध्यात्मिक आणि मानसिक शुद्धीकरणासोबतच आजच्या आधुनिक काळात पर्यावरणपूरक विसर्जन ही काळाची सर्वात मोठी आणि अनिवार्य गरज बनली




आहे. निसर्ग हाच खरा ईश्वर आहे आणि भारतीय संस्कृतीने नेहमीच निसर्गपूजेला प्राधान्य दिले आहे. पूर्वीच्या काळी मूर्ती केवळ शाडूच्या मातीपासून बनवल्या जायच्या, ज्या नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये अत्यंत सहज विरघळायच्या. मात्र, वाढत्या शहरीकरणामुळे आणि उत्सवी दिखावगारेपणामुळे रासायनिक रंग आणि प्लास्टर ऑफ पॅरिससारख्या अविघटनशील पदार्थांचा वापर प्रचंड वाढला आहे. यामुळे आपल्या नद्या, तलाव आणि समुद्राच्या पाण्याचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होऊन जलचर प्राण्यांच्या जिवाला आणि संपूर्ण परिसंस्थेला प्रचंड धोका निर्माण झाला आहे. आपण ज्या बाप्पाला निसर्गाचा देव मानतो, त्याच्याच उत्सवामुळे निसर्गाचा ऱ्हास होणे हा मोठा विरोधाभास आहे. भक्तीच्या नावाखाली आपण पर्यावरणाची कोणतीही हानी करणार नाही, याची जाणीव ठेवणे म्हणजेच खऱ्या अर्थाने बाप्पाची आराधना करणे होय.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने शाडूची माती किंवा कागदाच्या लगद्यापासून बनवलेल्या, नैसर्गिक रंगांनी रंगवलेल्या मूर्तींचीच स्थापना करण्याचा ठाम निश्चय केला पाहिजे. नैसर्गिक जलस्त्रोतांचे प्रदूषण टाळण्यासाठी स्थानिक प्रशासनाने उभारलेल्या कृत्रिम तलावांमध्ये मूर्तींचे विसर्जन करण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. शक्य असल्यास घरच्या घरी एका मोठ्या भांड्यात मूर्तीचे विसर्जन करून, ते मातीमिश्रित पाणी कुंडीतील झाडांना द्यावे; जेणेकरून बाप्पा कायम आपल्या घरात निसर्गाच्या रूपात वास करेल. तसेच उत्सवादरम्यान साचणारे हार, फुले, दुर्वा, केळीचे खांब आणि पाने यांसारखे निर्माल्य थेट पाण्यात न टाकता निर्माल्य कलशातच जमा करावे, जेणेकरून त्यापासून उत्तम दर्जाचे सेंद्रिय खत तयार करता येईल आणि ते पुन्हा निसर्गाच्याच कामी येईल.

श्री गणपती विसर्जन हा केवळ एक पारंपरिक किंवा दिखाव्याचा सोहळा राहू नये, तर ती स्वतःच्या आणि निसर्गाच्या शुद्धीकरणाची एक अत्यंत जाणीवपूर्वक केलेली पवित्र प्रक्रिया असावी. सणांमुळे पर्यावरणाचा कोणताही समतोल बिघडणार नाही याची काळजी घेतल्यास आपला उत्सव अधिक मंगलमय आणि अर्थपूर्ण ठरतो. स्वतःच्या मनातील दुर्गुणांचे विसर्जन करून अंतर्बाह्य शुद्ध होणे आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करून येणाऱ्या पिढीला एक निरोगी, समृद्ध आणि प्रदूषणमुक्त निसर्ग भेट देणे, हीच गणरायाच्या चरणी अर्पण केलेली आपली खरी आणि शाश्वत सेवा ठरेल. याच उदात्त विचाराने जेव्हा आपण "गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या" अशी साद घालतो, तेव्हा तो केवळ एक जयघोष राहत नाही, तर तो एक जीवनदायी संकल्प बनतो.

- ९५६१५९४३०६

# अभिषेक शर्मा एका वर्षात सर्वाधिक वेळा शुन्यावर बाद होणारा फलंदाज!

भारत आणि जपान यांच्यातील ऐतिहासिक टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अभिषेक शर्माने एक नकोसा विक्रम रचला. भारतीय सलामीवीर सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर गोल्डन डकवर बाद झाला आणि २०२६ मधील १०वा टी२० आंतरराष्ट्रीय यष्टीरक्षक ठरला. तथापि, या रोमांचक सामन्यात भारताने जपानचा २ धावांनी पराभव केला.

**अभिषेक शर्माने रचला नकोसा विक्रम**

सानो आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर जपानविरुद्धच्या सामन्यात अभिषेक शर्मा डावाच्या पहिल्याच चेंडूवर बाद झाला. या २६ वर्षीय डावखुऱ्या फलंदाजाने चार्ली हारा-हिंझेच्या गोलंदाजीवर स्वीप शॉट मारण्याचा प्रयत्न केला, परंतु चेंडू त्याच्या बॅटच्या वरच्या कडेला लागून शॉर्ट फाइन लेगच्या दिशेने गेला, ज्यामुळे तो झेलबाद झाला. या गोल्डन डकमुळे, अभिषेक

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

शर्मा २०२६ मधील सर्व टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १०व्यांदा शून्यावर बाद झाला. या पराक्रमात त्याने अफगाणिस्तानचा रशीद खान आणि पाकिस्तानचा शादाब खान यांना मागे टाकले.

**एका कॅलेंडर वर्षात १० वेळा शून्यावर बाद होणारा पहिला फलंदाज**

अभिषेक शर्मा आता टी-२० क्रिकेटमध्ये एका कॅलेंडर वर्षात १० वेळा शून्यावर बाद होणारा पहिला फलंदाज ठरला आहे. यापूर्वी, हा विक्रम अफगाणिस्तानचा रशीद खान आणि पाकिस्तानचा शादाब खान यांच्या नावावर संयुक्तपणे होता, प्रत्येकी नऊ वेळा शून्यावर बाद होण्याचा विक्रम त्यांच्या नावावर होता. रशीद खान २०१९ मध्ये टी-२० क्रिकेटमध्ये नऊ वेळा शून्यावर बाद झाला होता, तर शादाब खान २०२४ मध्ये नऊ वेळा बाद झाला होता. जपानविरुद्ध गोल्डन डकवर बाद होऊन अभिषेकने या दोघांनाही मागे टाकले.

**टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्येही पाचवे गोल्डन डक**

जपानविरुद्ध पहिल्याच चेंडूवर बाद झाल्यामुळे, अभिषेक शर्मानें यावर्षी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपले पाचवे गोल्डन डक नोंदवले. यासह त्याने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक वेळा शून्यावर बाद होण्याच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. याचा अर्थ असा की, २०२६ मध्ये टी२० क्रिकेटमध्ये अभिषेक एकूण १० वेळा शून्यावर बाद झाला आहे, ज्यात पाच वेळा तो टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यातील पहिल्याच चेंडूवर बाद झाला.

**भारताने जपानला २ धावांनी हरवले**

अभिषेक शर्मा लवकर बाद होऊनही, या ऐतिहासिक रोमांचक सामन्यात भारतीय संघाने जपानला २ धावांनी हरवले. पावसामुळे सामना प्रत्येकी पाच षटकांचा करण्यात आला.जपानच्या गोलंदाजांनी भारतीय फलंदाजांना धावा करण्याची फारशी संधी दिली नाही. अभिषेक शर्मा पहिल्याच चेंडूवर बाद झाल्यानंतर भारतीय डावाची सुरुवात खराब झाली. प्रथम फलंदाजी करताना भारताने ५ षटकांत ४ गडी गमावून ३२ धावा केल्या. प्रत्युत्तरात, जपान ५ षटकांत ३ गडी गमावून केवळ ३० धावाच करू शकला आणि भारताने हा सामना २ धावांनी जिंकला.

**भारताने एका ऐतिहासिक सामन्यात विजय नोंदवला**

भारत आणि जपान यांच्यातील हा सामना २०२६ च्या आशियाई खेळांच्या तयारीच्या दृष्टीनेही

| खेळाडू | देश | शून्यावर बाद (डक) | वर्ष |
| --- | --- | --- | --- |
| अभिषेक शर्मा | भारत | १० | २०२६ |
| राशिद खान | अफगाणिस्तान | ९ | २०१९ |
| शादाब खान | पाकिस्तान | ९ | २०२४ |

महत्त्वाचा होता. पावसामुळे सामना केवळ पाच षटकांचा झाला, परंतु असे असूनही सामन्यातील उत्कंठा कमी झाली नाही.

भारताने पहिल्या डावात ३२ धावा केल्या आणि त्यानंतर गोलंदाजीच्या जोरावर जपानला ३० धावांवर रोखले. अशाप्रकारे भारतीय संघाने हा ऐतिहासिक सामना २ धावांनी जिंकला.

एका कॅलेंडर वर्षात टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेळा शून्यावर (डक) बाद होण्याचा नकोसा जागतिक विक्रम भारताच्या अभिषेक शर्माच्या नावावर आहे. २०२६ या एकाच कॅलेंडर वर्षात तो तब्बल १० वेळा शून्यावर बाद झाला आहे. यापूर्वी हा विक्रम संयुक्तपणे अफगाणिस्तानचा फिरकीपटू राशिद खान आणि पाकिस्तानचा शादाब खान यांच्या नावावर होता, जे एका वर्षात ९-९ वेळा शून्यावर बाद झाले होते.

एकूण टी-२० क्रिकेटमध्ये (सर्व देशांतर्गत लीग, आयपीएल आणि आंतरराष्ट्रीय सामने मिळून) एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक वेळा शून्यावर बाद होणाऱ्या फलंदाजांची यादी रकान्यात दिली आहे.

जर केवळ आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांचा विचार केला, तर २०२६ मध्ये अभिषेक शर्मा ७ वेळा शून्यावर बाद झाला असून त्याने सायमन अयुब (२०२५) आणि रवांडाच्या खेळाडूंच्या सर्वाधिक ७ टी-२० आंतरराष्ट्रीय डकच्या जागतिक विक्रमाची बरोबरी केली आहे.

- ९०९६३७२०८२

# गणेश विसर्जन करतांना सावधगिरी बाळगा, नियमांचे पालन करा!

गणपती स्थापनेच्या दिड दिवसांपासून गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरूवात झालेली आहे.त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.कारण गणपती विसर्जन करतांना नदी,तलाव, विहीर, समुद्र किनारा याठिकाणी कळत-नकळत आपल्या चुकांनमुळे दुर्घटना होऊ शकते याला नाकारता येत नाही आणि अशा प्रकारच्या यापूर्वी अनेक दुर्घटना झालेल्या आहेत ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.

मागील वर्षी राज्यभरात वेगवेगळ्या जिल्ह्यात गणेश विसर्जनाला गालबोट लागले व १५ पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला.त्यामुळे गणेश विसर्जन

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

करतांना सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे लहान मुलांना विसर्जन स्थळापासुन (नदी, तलाव, विहीर, समुद्र किनारा) यापासून दुरच ठेवावे. कारण छोटीशी चुक संपूर्ण परिवारावर मोठा आघात करू शकते. कारण खेड्यापाड्यात, शहरात बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी भक्तगण विसर्जनाच्या ठिकाणी जातात. अशा परिस्थितीत कोणताही धोका ओढावून नये याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.

गणेश विसर्जनासाठी तलावांवर बंदी आहेच. परंतु प्रशासनाने जे गणेश विसर्जनाचे ठिकाण (स्थळ) दिले आहे किंवा प्रशासनाने बनवीलेल्या कृत्रिम तलाव यामध्ये विसर्जन करायला हवे. यदाकदाचित एखादी अकस्मात घटना घडली तर प्रशासन आपल्या मदतीला धावून येवु शकते. त्यामुळे प्रशासनाचे नियम पाळुन सवार्नी गणेश विसर्जनाचा आनंद घ्यावा व सावधगिरी बाळगवी. कारण आपण अनेकदा पाहिले व ऐकले सुध्दा आहे की मुर्ति विसर्जनाच्या वेळेस जिवीत हानी व दुर्घटना सुध्दा झालेल्या आहेत.या संपूर्ण गोष्टी डोळ्यासमोर ठेवून व सतर्कता बाळगुन गणेश विसर्जन केले पाहिजे.

त्याचप्रमाणे सरकारने व प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे.ज्या-ज्या



ठिकाणी कृत्रीम तलाव (आटीर्फीशीयल टॅक)ची व्यवस्था केलेली आहे, त्या-त्या ठिकाणी त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे.परंतु ज्या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था नाही असे भक्तगण नदी, विहीर, समुद्र किनारा, किंवा तलावामध्ये गणरायाचे विसर्जन करतात त्या-त्या ठिकाणी सर्वांनीच विसर्जन करतांना काटेकोरपने सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे. मुख्यत्वेकरून मंडळांचे मोठे गणपती असतात. अशा परिस्थितीत मंडळाच्या भक्तांनी गणपती विसर्जन करतांना सतर्कता बाळगून व प्रशासनाच्या नियमांचे पालन करून विसर्जन करावे.कारण छोटीशी चुक मोठा आघात पोहचवु शकते याला नाकारता येत नाही आणि याचे दुःख संपूर्ण परिवाराला व मंडळाला भोगावे लागते.

गणेश विसर्जनाच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की बाप्पांना निरोप देतांना गणेश विसर्जनाची प्रक्रीया सांभाळून करावी. त्याचप्रमाणे "निर्माल्य" तलाव, विहीर, नदी, समुद्र किनारा यामध्ये न टाकता प्रशासनाने निर्माल्याची व्यवस्था ज्या-ज्या ठिकाणी केली आहे त्या-त्या ठिकाणीच टाकावे.यामुळे प्रदूषणावर आवर घातला येईल व पाणी दुषित होण्यापासुन वाचेल. सोबतच जलचर प्राण्यांचे प्राणसुध्दा वाचेल. अशाप्रकारे संपूर्ण गणेश भक्तांनी काळजी घेणे आवश्यक आहे. गणपती बाप्पा आपल्या घरी दरवर्षी येणार व विराजमान होणारच. गणेश विसर्जन करतांना गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या !असा जयघोष करून बाप्पाणा आपण निरोप देवून विसर्जन करतो. परंतु गणेश विसर्जनाच्या निमित्ताने गणेश भक्तांनी आपल्या परिसरात एकतरी वृक्ष लावुन गणरायाला निरोप द्यावा.

अशा पध्दतीने गणपती बाप्पाच्या नावाने राज्यात दरवर्षी हजारो झाडांची लागवड अवश्य होईल यामुळे गुरांना चारा,सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. आज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे.कारण गणपती बाप्पासह संपूर्ण देवीदेवतांचे वास्तव्य निसर्गाच्या सान्निध्यात रहायचे त्यामुळे बदलते हवामान व अलनिनोचा प्रभाव लक्षात घेता वृक्षलागवड मानव कल्याणासाठी व पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतूंना आणि निसर्ग प्रफुल्लित करण्यासाठी प्रत्येक सणांना वृक्ष लागवड व्हायलाच हवी. बाप्पाला निरोप देतांना आपण सर्व भक्तगण साकडे घालूया येणाऱ्या दुष्काळापासुन बळीराजाला वाचवा."गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या" जय श्री गणेशाय नमः!

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# मध्य नागपूरातील चार सुप्रसिद्ध गणेशांचे सामूहिक 'महाविसर्जन'

## श्री संती गणेशोत्सव मंडळ, श्री दक्षिणामूर्ती स्वयंसेवक मंडळ, श्री पाताळेश्वर गणेशोत्सव मंडळ, भारत क्रीडा मंडळ, मन्नत पूर्ती सांस्कृतिक ट्रस्ट होणार सहभागी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पहिल्यांदाच मध्य नागपूरातील एकूण चार मोठ्या गणेश मंडळांनी एकत्रित मिरवणूक व गणेश विसर्जनाचा निर्णय घेऊन नागपूरकर जनतेला फार मोठा दिलासा दिला आहे. या सामूहिक महाविसर्जन सोहळ्यात महाल, सेंट्रल एव्हन्यू रोडवरील सुप्रसिद्ध श्री संती गणेशोत्सव मंडळ,श्री दक्षिणामूर्ती स्वयंसेवक मंडळ, श्री पाताळेश्वर गणेशोत्सव मंडळ(महालचा राजा) तसेच भारत क्रीडा मंडळ,मन्नत पूर्ती सांस्कृतिक ट्रस्ट सहभागी होणार आहेत. मध्य नागपूरचे भाजपचे आमदार प्रवीण दटके यांच्या पुढाकारातून नागपूरातच नव्हे तर विदर्भातील ही अभिनव व अतिशय स्तुत्य अशी संकल्पना साकारली जाणार आहे.



आज पत्रकार परिषदेत बोलताना सुप्रसिद्ध संती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने बोलताना संजय चिंचोले यांनी सांगितले की, दरवर्षी भाविक हे विसर्जनाच्या दिवशी आपल्या लाडक्या गणपतीची वाट पाहत किती तरी तास ताटकळत उभे राहतात. मग तो संतीचा गणपती असो,महाल चा राजा असो किंवा इतर गणपती मंडळाची मिरवणूक असो. यावेळी विविध मंडळांच्या वेगवेगळ्या मिरवणुका वेगवेगळ्या दिवशी व वेगवेगळ्या वेळेत न काढता एकत्रित्रपणे काढण्याचा निर्णय वरील चार ही गणेश मंडळांनी घेतलेला असल्याचे चिंचोले म्हणाले. यामुळे पोलीस प्रशासनावरील ताण, परिसरातील दैनदिन व्यवहारांवर होणारा परिणाम, वाहतूकीचा खोळंबा, नागरिकांची गैरसोय इत्यादी बाबी टाळण्याचा निर्णय आम्ही सर्वांनी घेतला असून एकत्रित मिरवणूक-शिस्तबद्ध विसर्जन-वाहतूक व्यवस्थेला सहकार्य तसेच भाविकांची सोय व आनंद एकत्रितपणे साधल्या जाणार असल्याचे ते म्हणाले.

मुंबई व पुणे यासारख्या मोठमोठ्या शहरात गणेश विसर्जन सोहळे सामूहिक स्वरुपातच होत असतात.त्याच धर्तीवर नागपूरात प्रथमच सामूहिक व शिस्तबद्ध, नियोजनबद्ध विसर्जन मिरवणूकीची परंपरा निर्माण करण्याचा हा प्रयत्न असल्याचे चिंचोले म्हणाले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक एकता, संस्कृती, शिस्त आणि बंधुभावाचा उत्सव आहे. त्यामुळे सर्व मंडळांनी एकत्रित येऊन विसर्जन मिरवणूक काढल्यास नागरिकांमध्येही एकतेचा सकारात्मक संदेश जाईल,असे त्यांनी सांगितले.

आम्ही चार ही मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार प्रत्येक मंडळाचे सुमारे १०० कार्यकर्ते व स्वयंसेवक ही महाविसर्जन मिरवणूक सुरळीत,शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडावी यासाठी मिरवणूकीच्या व्यवस्थेमध्ये सक्रियपणे सहभागी होणार आहेत अशी माहिती त्यांनी दिली. हे कार्यकर्ते व स्वयंसेवक मिरवणुकीदरम्यान नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही तसेच मिरवणुकीत शिस्त व सुव्यवस्था कायम राहील, याची विशेष काळजी घेतील. 'सेवा, शिस्त व समन्वय'या त्रिसुत्रीचा अवलंब करुन चारही मंडळाचे कार्यकर्ते, महाविसर्जन सोहळा शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी योगदान देतील,असे त्यांनी सांगितले.

### असा आहे महाविसर्जन मिरवणूकीचा मार्ग

शनिवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता संती गणेश मंडळाच्या मिरवणूकीची सुरवात सेंट्रल एव्हेन्यू वरुन होऊन बडकस चौक महालात येईल. यानंतर भारत गणेश मंडळाच्या मिरवणूकीची सुरवात होईल, यानंतर पाताळेश्वर महालच्या राजाची मिरवणूक निघेल व सर्वात शेवटी श्री दक्षिणामूर्ती मंडळाच्या मिरवणूकीला प्रारंभ होईल. या सर्व मिरवणूका शिस्तबद्धरित्या वाटचाल करीत बडकस चौक-कोतवाली चौक-नरसिंग टॉकीज मार्गे-शिवाजी महाराज चौक-चिटणीस पार्क चौक येथे समाप्त होतील. मिरवणूकीचा अवधी सायंकाळी ६ ते रात्री १० एवढाच असणार आहे व याच ठिकाणाहून आपापल्या वाहनांनी गणेश विसर्जनासाठी शांततेत मार्गस्थ होतील. एकमेव संती गणेशाचे विसर्जन गोरेवाडा तलावात होणार असून इतर तीन मंडळाचे गणेश विसर्जन कच्छीविसा येथे होणार आहे.

---

# विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२७ साठी नागपूरच्या युवकांना सहभागाचे आवाहन

### १५ ते २९ वयोगटातील युवकांना 'माय भारत' पोर्टलवर नोंदणीची संधी; जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर होणार निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या



विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२७ ची रूपरेषा जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रीय युवा महोत्सवांतर्गत १० ते १२ जानेवारी २०२७ दरम्यान नवी दिल्ली येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. देशातील युवकांना ह्यविकसित भारत @२०४७ या संकल्पनेशी जोडणे तसेच त्यांच्या विचारांचा धोरणनिर्मिती प्रक्रियेत समावेश करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या कार्यक्रमासाठी १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक सहभागी होण्यास पात्र आहेत. माय भारत पोर्टलवर नोंदणी करून निवड प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाइन नोंदणी व निबंध स्पर्धा आयोजित केली जाणार आहे.

यंदाच्या VBYLD मध्ये विकसित भारत चॅलेंज, कल्चरल ट्रॅक, डिझाइन फॉर भारत, हॅक फॉर सोशल गुड, यूथ एंटरप्रेन्युअर्स चॅलेंज आणि यूथ पार्लमेंट यांचा समावेश करण्यात आला आहे. विकसित भारत चॅलेंज ट्रॅकअंतर्गत देशभरातील १० प्रादेशिक क्लस्टर्समध्ये विभागणी करण्यात आली असून, त्यामध्ये विविध राज्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण धोरणांनुसार उपाययोजना विकसित करण्याची संधी युवकांना मिळणार आहे. सहभागी युवकांची निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा तीन स्तरांवर राबविण्यात येणार आहे. नागपूरमधील अधिकाधिक युवकांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन माय भारत, नागपूरचे उपनिदेशक सौरभ कुमार निषाद यांनी केले आहे. मंचावरील रमेश अहिरकर उपस्थित होते.

---

# संपूर्ण भागीदारी महाआंदोलनातर्फे २२ मागण्यांचे निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आजाद समाज पार्टी (कांशीराम) आणि भीम आर्मी च्यावतीने संपूर्ण भागीदारी महाआंदोलना अंतर्गत विविध घटनात्मक, सामाजिक व आरक्षणासंदर्भातील २२ मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले. राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार चंद्रशेखर आजाद यांच्या देशव्यापी आवाहनानुसार आयोजित या आंदोलनाचा उद्देश शोषित, वंचित, बहुजन, अल्पसंख्याक तसेच मागासवर्गीय समाजाच्या घटनात्मक हक्कांसाठी आवाज उठविणे हा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण व SC, ST, OBC महिलांसाठी कोट्यातील कोटा, लोकसभा-विधानसभेत OBC समाजाला योग्य राजकीय प्रतिनिधित्व, जातनिहाय जनगणनेत डइउ साठी स्वतंत्र नोंद, उच्च न्यायव्यवस्थेत SC, ST, OBC प्रतिनिधित्व आणि उच्च न्यायिक आयोगाची स्थापना यांचा समावेश आहे.

तसेच ओबीसी क्रीमी लेअरची उत्पन्नमर्यादा सुधारावी, पदोन्नतीत SC, ST, OBC आरक्षण लागू करावे, उच्च शिक्षण संस्थांमधील जातीय भेदभाव रोखण्यासाठी प्रभावी कायदेशीर तरतुदी कराव्यात, SC- ST अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील नुकसानभरपाई वाढवावी, सरकारी योजना व अर्थसंकल्पात लोकसंख्येच्या प्रमाणात हिस्सेदारी द्यावी, सरकारी कंत्राटे व खरेदीमध्ये आरक्षण लागू करावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. खासगी क्षेत्रात व्यवस्थापन व नेतृत्वाच्या पदांवर वंचित घटकांना प्रतिनिधित्व, मंडल आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी, आरक्षणाचा प्रलंबित अनुशेष भरणे, सरकारी सेवांमधील लॅटरल एंट्री व कंत्राटी पद्धतीला विरोध, विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणात वसतिगृहांची निर्मिती तसेच माध्यम क्षेत्रात वंचित समाजाचे प्रतिनिधित्व वाढविण्याची मागणीही करण्यात आली आहे.

सफाई कामगारांना कायमस्वरूपी नियुक्ती, समान कामासाठी समान वेतन, सामाजिक सुरक्षा व पेन्शन देणे, सीवर व सेप्टिक टँक साफसफाईसाठी मानवी प्रवेश पूर्णपणे बंद करून आधुनिक यंत्रांचा वापर करणे, तसेच दुर्घटनेत सफाई कामगाराचा मृत्यू झाल्यास कुटुंबाला ३० लाख रुपये मदत, सरकारी नोकरी व पुनर्वसन देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली.

आजाद समाज पार्टी (कांशीराम) व भीम आर्मी महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून त्या राष्ट्रपतींकडे पाठवाव्यात आणि संबंधित प्रश्नांवर केंद्र व राज्य सरकारने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी निवेदन देते वेळी आजाद समाज पार्टी कांशीरामचे जिल्हा अध्यक्ष ओपूल तामगाडगे, जिल्हा सचिव विशाल बनसोड, सूरज पुराणिक, रोशन ठवरे, दीक्षा ताई चवरे, अशीत पाटील, अमन पाटील, अश्विन पाटील, दीपक पाटील, बादल बनसोड, प्रथम पानसे, बाळा पाटील, साशंक भोयर, सौरभ गुप्ता, मयुर बागडे, श्याम चोपडे, सचिन जयस्वाल वंदनाताई इंगळे (नागपूर जिल्हा उपाध्यक्ष महिला ब्रिगेत) नेहताई राऊत (नागपुर जिल्हा अध्यक्ष महीला ब्रिगेट) राहुल भाऊ जगताप (नागपूर जिल्हा सचिव) आकाश गाज्भिये (नागपुर जिल्हा महासचिव) संघरतना गेडाम (नागपुर जिल्हा उपाध्यक्ष) पौर्णिमा ताई वानखेडे (उत्तर नागपूर महासचिव) सीलाताई वासनिक (नागपूर जिल्हा उपाध्यक्ष) शेखरभाऊ उके (कामठी विधानसभा अध्यक्ष) शकील मदारी, पुरुषोत्तम तायवाडे, नायांशू लोखंडे, हर्ष डोंगरे प्रत्रकार संघाच्या सुजाता मसराम पत्रकार संघाचे वसंता पाटील इत्यादीची उपस्थिती होती.

---

# 'आनंद वाटला की आनंद वाढतो', २०० आदिवासी विद्यार्थ्यांनी अनुभवली नागपूरची अविस्मरणीय सफर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यातच खरा आनंद आहे या भावनेतून माँ (टं) Group of Friends of Nagpur यांच्या वतीने २० सप्टेंबर रोजी गुरुकुल आश्रम, उदासा आणि देवलापार येथील सुमारे २०० आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नागपूरमध्ये पहिल्यांदाच विशेष वन-डे पिकनिकचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना नागपूर शहरातील विविध ठिकाणांना भेट देण्याची आणि अनेक नवीन अनुभव घेण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच नागपूर मेट्रोचा प्रवास केला. मेट्रोच्या प्रवासाचा आनंद घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यांवरचा उत्साह आणि आनंद पाहण्यासारखा होता.



यानंतर विद्यार्थ्यांनी महाराजबागची सफर केली. तसेच गोडरेज आनंदम येथे श्री. ठक्कर यांनी स्वतः विद्यार्थ्यांना नाश्ता वाढून दिला. त्यांच्या आपुलकीच्या स्वागतामुळे विद्यार्थ्यांना विशेष आनंद झाला. दुपारच्या भोजनाची व्यवस्था हॉटेल द्वारकामाई येथे करण्यात आली होती. स्वादिष्ट भोजनासोबतच विद्यार्थ्यांसाठी जादूचा कार्यक्रम आणि सरप्राइज गिफ्ट्सचे आयोजन करण्यात आले. या सुंदर आयोजनाबद्दल द्वारकामाई परिवाराचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

दिवसभराच्या आनंदमय सफरीनंतर विद्यार्थ्यांना गणेश टेकडीचे दर्शन घडवण्यात आले. संपूर्ण दिवस उत्साह, आनंद आणि नवीन अनुभवांनी भरलेला होता.

या अविस्मरणीय दिवसाबद्दल विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना, हा दिवस आम्ही कधीच विसरणार नाही. पुन्हा



अशी संधी मिळाली तर आम्हाला नक्की यायला आवडेल, असे सांगितले.

या उपक्रमातून 'खरा आनंद दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यात आहे' हा सुंदर संदेश देण्यात आला. आपल्या परीने इतरांच्या आयुष्यात आनंदाचे काही क्षण निर्माण करणे हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याचे यावेळी जाणवून देण्यात आले.

माँ (Maa) Group of Friends of Nagpurच्या सदस्यांनी भविष्यातही अशाच प्रकारे एकत्र येऊन गरजू आणि वंचित मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी विविध उपक्रम राबवण्याचा संकल्प केला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान, आनंद आणि उत्साह हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले.

---

**थोडक्यात**

## आज धानोलीसह मौदा तालुक्यातील विविध गणेश मंडळात महाप्रसादाचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

उद्या शुक्रवार (ता. २५ सप्टेंबर)ला अनंत चतुर्दशी निमित्त



अरोली - कोदामेंढी जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या धानोली सह तालुक्यातील गावा-गावातील विविध गणेश मंडळात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. धानोली येथे श्री विनायक बाल गणेश उत्सव मंडळ धानोली व मित्र परिवारातर्फे उद्या शुक्रवार (ता.२५ सप्टेंबर) ला सायंकाळी ७ ते १० वाजेपर्यंत ग्रामपंचायतच्या भव्य पटांगणावर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. तरी या महाप्रसादाच्या लाभ घेण्याचे आवाहन मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले.

## अरोली-कोदामेंढी जि. प.सर्कल अंतर्गत गणेश मंडळांना मौदा तालुक्यातील भाजपा व भाजयुमो पदाधिकाऱ्यांच्या भेटी





**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

अरोली - कोदामेंढी जि. प.सर्कल अंतर्गत येणाऱ्या गावातील गणेश उत्सव मंडळाला मौदा तालुक्यातील भाजपा व भाजयूमो पदाधिकाऱ्यांनी भेटी देऊन, मंडळ पदाधिकाऱ्यांच्या उत्साह वाढविला. याप्रसंगी भगवान बावनकुळे अध्यक्ष भाजपा मौदा तालुका, नरेश बावानकुळे सदस्य समन्वय समिती मौदा, चंद्रशेखर जाधव अध्यक्ष भाजपा अ.जा. मौदा तालुका, गोपाल गिरमेकर उपसरपंच कोदामेंढी, अमोल नरोले सरपंच धानोली, विनोद गभने सरपंच तांडा, दर्शना बागड़े सरपंच तोडली, रामपाल धांडे उपसरपंच तोडली, विनोद कारेमोरे माजी सरपंच सिरसोली, गंगाधर डोरले अध्यक्ष तंटामुक्त समिती तांडा, कैलाश खराबे, शंकर भूरे, कोमल मेहर, मनोज वाणी, शंकर चाफले, विष्णु भूते, आनंदराव बांते, निखिल बडवाईक, प्रणय भुतांगे व गणेश मंडळचे सपूर्ण पदाधिकारी व सदस्यगण उपस्थित होते.

## भव्या पोरवालची लॉन टेनिस स्पर्धेत राज्यस्तराकरिता निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

कामठी येथील सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी भव्या पोरवालची लॉन टेनिस स्पधेर्साठी राज्यस्तरावर



निवड झाली. क्रीडा संचनालय पुणे अंतर्गत आयोजित विभागीय शालेय लॉन टेनिस क्रीडा स्पर्धा २२ ते २४ सप्टेंबर २०२६ ला एम एस एल टी ए नागपूर महानगरपालिका टेनिस कोर्ट रामनगर नागपूर येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये सेठ केसरीमल पोरवाल कॉलेजचा विद्यार्थी भव्या पोरवालची भिडंत सेमी फायनलसाठी आलोक मिश्रा दिल्ली पब्लिक स्कूल लावा नागपूरसोबत झाली.

ही मॅच ट्रायबेकर मध्ये जाऊन ७-४ ने भव्याने जिंकून फायनलमध्ये प्रवेश केला फायनल मध्ये मनवेंद्र त्रिवेदी सेंटर पॉइंट स्कूल दाभा सोबत फायनल मॅच होती. फायनल मॅचमध्ये देखील ट्रायबेकरमध्ये ८-६ ने मात करत भव्याने विजय संपादन केला.या विद्याथ्यार्ला कॉलेजच्या प्रा डॉ. मल्लिका नागपुरे यांचे सहकार्य लाभले. तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दहात व उपप्राचार्य प्रा. विश्वनाथ वंजारी तसेच कॉलेजचे पर्यवेक्षक प्रा. नरेंद्र मेंढे व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुढील राज्यस्तराकरिता भव्या पोरवाल ला शुभेच्छा दिल्या.

## पोरवाल कॉलेजच्या रणरागिणींची मैदानात बाजी, लेदर बॉल संघ तालुका स्तरावर विजयी!



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

कामठी येथील एस के पोरवाल कॉलेज कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींची लेदर बॉल टीम साठी जिल्हास्तरीकरिता निवड झाली ही स्पर्धा दिनांक २४ सप्टेंबरला कॉलेज क्रिकेट मैदानावर घेण्यात आली चमूमध्ये अंशिका झंझोट ,सानिया शफी, साक्षी सहारे,सृष्टी तांडेकर, शर्वरी बाबरे, वंशिका जीवतोडे,निधी राखणे,धारणा कादियान, प्रीती सोनवणे, खेळाडूने आपले उत्कृष्ट प्रदर्शन दाखवून आपली पकड जिल्हास्तरांकरिता मजबूत केली. कॉलेजच्या विद्यार्थिनींना प्राध्यापिका डॉक्टर मल्लिका नागपुरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.खेळाडू मुलींना लाभले विजेता विद्यार्थिनींचे कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दाहात सर उपप्राचार्य प्रा विश्वनाथ वंजारी सर व पर्यवेक्षक प्रा नरेंद्र मेंढे सर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मुलींच्या जिल्हास्तरीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेला आपल्या शुभेच्छा दिल्या.

# डिजिटल तंत्रज्ञान आणि एआयमुळे मिळेल पर्यटन व्यवसायाला गती

## जागतिक पर्यटन दिनानिमित्त एमटीडीसीतर्फे आयोजित परिसंवादात मान्यवरांचे मत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे (एमटीडीसी) व्यवस्थापकीय संचालक निलेश गटने यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालये आणि पर्यटक निवासांमध्ये जागतिक पर्यटन दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने एमटीडीसीच्या प्रादेशिक कार्यालय व पर्यटक निवास, नागपूर यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.




यंदाच्या जागतिक पर्यटन दिनाची संकल्पना डिजिटल अजेंडा अँड आर्टिफिशियल इंटेलिजेन्स टू रिडिझाईन टुरिझम ही होती. यानिमित्त आयोजित परिसंवादात मान्यवरांनी डिजिटल तंत्रज्ञान आणि एआयमुळे मिळेल पर्यटन व्यवसायाला गती मिळणार असल्याची भावना व्यक्त केली. २४ सप्टेंबर रोजी नागपूर पर्यटक निवासाच्या सभागृहात आयोजित परिसंवादात अतिरिक्त पोलिस आयुक्त (क्राईम) राजेंद्र दाभाडे, आयपीएस, नागपूर हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष व विदर्भ टॅक्स पेयर्स असोसिएशनचे सचिव तेजेंदरसिंग रेणू, ट्रॅव्हल एजंट असोसिएशनचे सचिव राजेंद्र आकोलकर, कायदेतज्ज्ञ व रोटरीचे सहाय्यक गव्हर्नर शुभंकर अजय पाटील आणि अशोक हॉटेलचे मालक संजय गुप्ता यांनी मार्गदर्शन केले.

यानिमित्ताने चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे वितरीत करण्यात आली. तसेच, एमटीडीसीला सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे व उपस्थितांचे एमटीडीसीचे वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक, नागपूर, श्री. दिनेश पाटील यांनी आभार मानले.

**ज्येष्ठ नागरिकांसह विविध घटकांना सवलत**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त एमटीडीसीच्या पर्यटक निवासांमध्ये विविध घटकांसाठी सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांना सोमवार ते गुरुवार २० टक्के, शासकीय कर्मचाऱ्यांना १० टक्के, ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना २० टक्के आणि माजी सैनिकांना २० टक्के सवलत देण्यात येत आहे. या सवलतींचा अधिकाधिक पर्यटकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. दिनेश पाटील यांनी केले.

थोडक्यात

## येसंबा येथे मारोती देवस्थान पंचकमेटी साकारतेय ५१ फुटी हनुमान मंदिराचा कळस

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

चाचेर-निमखेडा जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या येसंबा येथील श्री हनुमान मंदिराच्या कळसाचे भव्य बांधकाम सुरू असून, तब्बल



५१ फूट उंचीचा कळस साकारला जात आहे. महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील विशेष कारागीर या कळसाचे बांधकाम करीत आहे. मौदा तालुक्यात अशा प्रकारचा ५१ फुटी कळस असलेले येसंबा हे एकमेव देवस्थान ठरणार असल्याने परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. श्री हनुमान मंदिर परिसराच्या विकासाच्या दृष्टीने हा कळस विशेष आकर्षण ठरणार आहे. मंदिराची धार्मिक व आध्यात्मिक परंपरा जपत ग्रामस्थ, भाविक आणि देणगीदारांच्या सहकार्याने कळसाचे बांधकाम करण्यात येत आहे. भव्य कळसामुळे मंदिराच्या सौंदर्यात भर पडणार असून, येसंबा गावाच्या धार्मिक पर्यटनाला देखील चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या भव्य कळसाच्या बांधकामासाठी ग्रामस्थ व भाविकांचे सहकार्य लाभत असून, मंदिर विकासासाठी पुढील काळातही विविध उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. श्री हनुमान मंदिराच्या ५१ फुटी कळसामुळे येसंबा गावाच्या धार्मिक वैभवात मानाचा तुरा रोवला जाणार आहे, असे देवस्थान पंच कमिटीचे पदाधिकारी व सध्या बांधकामावर विशेष देखरेख ठेवणाऱ्या पोलीस पाटील नरेंद्र राऊत यांनी सांगितले.

## पारवे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात




**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

येथील पारवे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सहसचिव दीपिका पारवे होत्या. संस्थेचे संचालक कृष्णकुमार मिश्रा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची भाषणे घेण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांनी श्रमदान करून सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात आले.

दीपिका पारवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होऊन समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळते, असे सांगितले. कृष्णकुमार मिश्रा यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. वैशाली राऊत यांनी केले, तर पूनम गोंडी-मेश्राम यांनी आभार मानले. यावेळी प्रकाश देवीकर, आशिष बिसणे, डॉ. संगीता चव्हाण, देवेंद्र यांच्यासह महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. गौरी गोंगल, तनु सहारे, अंकित लांडे, रुपेश चौधरी, युधिष्ठिर भाकरे, ज्ञानेश्वर सोनकुसरे, मनीष चनुडे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## सत्यशोधक समाज वर्धापन दिनानिमित्त अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सत्यशोधक समाज वर्धापन दिनानिमित्त कॉटन मार्केट येथील महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रामुख्याने शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रफुल्ल गुडधे, महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. अरूण पवार, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे शरद वानखेडे, ओबीसी युवा अधिकार मंचाचे उमेश कोरराम प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समता, बंधुता, सामाजिक न्याय, शिक्षण आणि मानवमुक्तीचा विचार समाजासमोर मांडला. सत्यशोधक समाजाने शोषित, वंचित आणि उपेक्षित घटकांच्या न्यायासाठी दिलेला संघर्ष आजही प्रेरणादायी आहे. सत्यशोधक विचारांची प्रेरणा घेऊन सामाजिक न्याय, समता आणि लोकहिताच्या संघर्षाला अधिक बळ देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

या अभिवादन कार्यक्रमाला वंदना वनकर, प्रा.रमेश पिसे, तिरळे कुणबी समाज संस्थेचे सचिव सुरेश जिचकार,बाबा बिडकर, ज्ञानेश्वर रक्षक, संजय शेंडे, परमेश्वर राऊत, सागर चव्हाण, पीयूष आकरे, कृतल आकरे, आकाश वैद्य, देवेंद्र समर्थ, यजुर्वेद शेलोकर,अंशुल जिचकार,सुषमा भड, राम बांते, अशोक काकडे, समीक्षा गणेशे यांच्यासह विविध सामाजिक क्षेत्रांतील अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गौरव मनोहर टिक्कस यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

न्यु म्हाळगी नगर येथील रहिवासी, चि. गौरव मनोहर टिक्कस यांचे



आज अल्प आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यु समयी त्यांचे वय ३२ होते. त्यांच्या पश्चात आई, भाऊ (भूषण टिक्कस) आणि बहीण व बराच मोठा परिवार आहे. आज दि. २४ सप्टेंबर गुरुवारला अंतिम संस्कार मानेवाडा घाटावर सायंकाळी ५ वाजता करण्यात आले.

## देवयानी जोशी यांच्या "गुजगोष्टी"

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्रीस्वामी समर्थ सेवा मंडळ, श्रीस्वामी मठ मालवीयनगर नगर नागपूर यांच्यातर्फे दि. २७ सप्टेंबर रोजी रविवारी देवयानी संदिप जोशी यांचा "गुजगोष्टी " हा आगळा वेगळा कार्यक्रम आयोजित



करण्यात आला आहे. कोरोना काळात आपल्या मैत्रिणींच्या ग्रुप वर रोज एक गोष्ट सांगून त्यांचे मनोधैर्य वाढवायचे हा विचार मनात ठेऊन सुरु झालेला हा उपक्रम पुढे खूपच यशस्वी झाला. आणि तो केवळ मैत्रिणींच्या ग्रुप पुरता मर्यादित न राहता फेसबुक, यूट्यूब आणि इंस्टाग्राम च्या माध्यमातून जगभर पोहोचला.

सामाजिक कार्यकर्ती, उत्तम बास्केटबॉल पटू, फक्त महिलांसाठी सुरु केलेली soprtbuds ही संस्था, ही त्यांची ओळख तर आहेच पण खेळ हा त्यांचा वारसा असून लोकांशी जोडून घेण्याची पण त्यांना आवड आहे. सकारात्मकता, आत्मविकास, सहानुभूती, सजग जीवन, प्रेमाने आणि आनंदाने जगूया, अश्या सगळ्या भावभावना असलेल्या आणि अत्यन्त कमी शब्दात जीवनाचा बराच मोठा अर्थ सांगणाऱ्या देवायानी जोशी यांच्या गोष्टी आपले मनोरंजन करता करता शेवटी एक बोध देऊन जातात.

हा कार्यक्रम रविवारी दि. २७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या अश्या या मनोरंजक तसेच बोधप्रद कार्यक्रमास सर्व रसिक, भाविक प्रेक्षकांनी उपस्थित राहावे अशी विनंती श्रीस्वामी समर्थ सेवा मंडळातर्फे करण्यात येत आहे.

# प्रकाश हायस्कूल येथे 'चला शाळेत जाऊया' अभियानाची सुरवात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सेवा संकल्प अभियानांतर्गत प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कांद्री यांच्या वतीने नवसाक्षर जनजागृती व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. नवसाक्षर नागरिकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व, साक्षरतेची गरज तसेच पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच चला शाळेत जाऊया अभियानाची सुरवात करण्यात आली.




कार्यक्रमाला रामटेकचे तहसीलदार रमेश कोळपे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कांद्रीचे प्राचार्य मिलिंद वानखेडे, पटवारी पृथ्वीराज पाणतावणे तसेच कांद्री ग्रामपंचायतीचे सचिव मुकुंदा मरस्कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाचे संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि समाजातील प्रत्येक घटकाला साक्षरतेच्या प्रवाहात आणण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. बाल गणेश मंडळ कांद्री माईन येथे विद्यार्थी प्रभात फेरी काढण्यात आली नवसाक्षरतेचा फलक लावून कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.तहसीलदार यांचा हस्ते शाळेत वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कामिनी पाटील, आभार विजय लांडे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्याम गासमवार, अशोक नाटकर, प्रशांत सरपाते, सुचिता नागपुरे, अनिता खंडाईत, ज्योत्स्ना मेश्राम, अनिता बागडे, बसंत ठकराले, प्रभाकर खंडाते, मिलिंद वाघमारे प्रयत्नशील होते.

# खत विक्रीतील एफएफएस प्रणाली रद्द करा : सरपंच संघटनेची मागणी

## शेतकऱ्यांना वेळेत व सुलभ पद्धतीने खते उपलब्ध करून देण्यासाठी तहसीलदारांना दिले निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

रासायनिक खतांच्या विक्रीसाठी लागू करण्यात येत असलेली एफएफएस प्रणाली रद्द करावी, अशी मागणी तालुका सरपंच संघटनेने तहसीलदारांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

कृषी विभागामार्फत FFS प्रणालीद्वारे खतविक्री प्रक्रिया राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, या प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम व चिंता निर्माण झाली असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. खरीप तसेच रब्बी हंगामात शेतकऱ्यांना वेळेवर आणि सुलभ पद्धतीने रासायनिक खते उपलब्ध होणे आवश्यक आहे. नवीन



प्रणालीमुळे खत खरेदी करताना अतिरिक्त प्रक्रिया, तांत्रिक अडचणी किंवा विलंब निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांवर होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे FFS प्रणाली पूर्णपणे रद्द करून पूर्वीप्रमाणे सुलभ पद्धतीने खत विक्री व्यवस्था सुरू ठेवावी, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे. तसेच खत विक्री प्रक्रियेत शेतकऱ्यांना कोणताही अतिरिक्त त्रास अथवा विलंब होऊ नये आणि वेळेत खते उपलब्ध करून देण्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

भिवापूर तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष अनिकेत वराडे, उपाध्यक्ष शीतल राजूरकर आणि सचिव प्रीती पडोळे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार संजय राठोड यांना गुरुवारी निवेदन देण्यात आले. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून निवेदनातील मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. यावेळी सुनील कुमरे, प्रीती चौधरी, हरिश्चन्द्र चौधरी, मेघा मार्गनवार, मंजुषा डोमळे, आरती भोयर, वैशाली चौधरी, सुनंदा इरपाते, लता भोगे, राखी इंगोले, सपना मोहोड, गुरुदेव काळे, रुपेश श्रीरामे, नंदकिशोर तिवाडे, सुनील लेकुरवाळे, शिला गुरले, नागेश्वर उपरे, अरुण वरघणे, रामकृष्ण झाडे इत्यादी सरपंच मंडळी उपस्थित होती.

## आमदार समीर मेघे यांचे गणरायाला साकडे, दवलामेटीतील गणेशोत्सव मंडळाच्या महाआरतीत सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

हिंगणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समीर मेघे यांनी गणेश नगर, दवलामेटी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज गणेशोत्सव मंडळातील श्री गणरायाचे दर्शन घेत महाआरतीत सहभाग घेतला. आमदारांच्या



उपस्थितीने गणेश नगर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. मंडळ मंत्री तथा भाजपचे अक्षय मोहिते, गोधणी यांच्या पुढाकारातून आयोजित कार्यक्रमात विविध मान्यवरांनी उपस्थित राहून मंडळाला शुभेच्छा दिल्या. मंडळाचे अध्यक्ष रोशन मोहिते, उपाध्यक्ष कार्तिक मोहिते व पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी वाडी नगराध्यक्ष नरेश चरडे, नगरसेवक हर्षल काकडे, सरपंच देवराव कडू, सुजित नितनवरे, गजानन रामेकर, प्रकाश डवरे, प्रमोद राऊत, संजय कंपनीचोर, नितीन अडसड, सुशील बावणे, धनराज दिघोरे, एकनाथ मोहिते, सतीश खोब्रागडे, सुनील दुभे, प्रकाश मेश्राम, रोशन मेश्राम, करण मोहिते, राजेश चांदेकर, ज्योतिस्ना नितीनवरे, रश्मी पाटील यांच्यासह मान्यवर व नागरिक उपस्थित होते. गणेश नगर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गणरायाचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. भजन मंडळातील चेतन पन्नासे, पुरुषोत्तम पारधी, जनलाल पारधी, ताराचंद पचले, कुधराम परले, राजेंद्र साबर व अंकुश तांबे यांनी भजन सादर केले.

# खरेदी-विक्री संस्थेच्या आमसभेत व्यवहारांच्या चौकशीवर चर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

भिवापूर तालुका शेतकी सहकारी खरेदी-विक्री समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा २३ सप्टेंबर रोजी साईधाम सभागृहात संस्थेचे सभापती भास्कर भाऊराव येंगळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेस तालुक्यातील ७५० हून अधिक सभासद उपस्थित होते.




सभेत सन २०२५-२६ चा जमा-खर्च व वार्षिक हिशेब, तसेच सन २०२६-२७ चे अंदाजपत्रक यासह विविध विषयांवर चर्चा करून सर्व विषय मंजूर करण्यात आले. संस्थेच्या रेशन दुकान, शासकीय आधारभूत धान खरेदी, नाफेडअंतर्गत चणा खरेदी तसेच रासायनिक खतांच्या व्यवहारांबाबत सुरू असलेल्या चौकशीची माहिती सभासदांना देण्यात आली. खत विक्रीच्या व्यवहारात ३३ लक्ष ५१ हजार रुपयांचा घोळ करणाऱ्या संस्थेच्या निलंबित कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, असा ठराव सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. काही सभासदांनी संस्थेच्या कामकाजाबाबत सूचना मांडल्या.

दरम्यान, भिवापूर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी धामणगाव (वि.)चे माजी सरपंच गावंडे यांनी केली. या मागणीला संचालक अरविंद चौधरी, दिलीप राऊत, बाजार समितीचे संचालक तुकाराम मोहड, प्रभाकर माळवे, प्रताप बोराडे आणि दयाराम थेटे यांनी अनुमोदन दिले.

सभेस उपसभापती अनिल ढोबळे, संचालक अरविंद चौधरी, शत्रुघ्न राऊत, कवडु आदमने, राजु ठोंबरे, आनंद गुप्ता, राजु इंगोले, नरेंद्र तुरक, विजय भोयर, दिलीप वराडे, सुयोग पंचाळ, श्रावण भोगे, सोनबा मेश्राम, दयाराम फरकाडे, अर्चना भोयर, रेखाताई डुकरे आदींसह सुधाकर बोरकुटे, सुभाष राऊत, प्रमोद राऊत, राजेश्वर वराडे, अविनाश चिमुरकर सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी संस्थांचे अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते. सहव्यवस्थापक बबन नागोसे आणि कर्मचारी उपस्थित होते. सभा शांततेत पार पडली.

# जादूटोण्याच्या संशयातून रविशंकर रहांगडाले यांची हत्या, २४ तासांत खुनाचा उलगडा

## मुंडीपार (एमआयडीसी) येथील घटना; दोघे आरोपी ताब्यात, दोन विधिसंघर्ष बालकांचाही सहभाग असल्याची पोलिसांची माहिती

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**




मुंडीपार (एमआयडीसी) परिसरात झालेल्या रविशंकर उदेलाल रहांगडाले (वय ५८) यांच्या खुनाचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या २४ तासांत उलगडा केल्याची माहिती गोंदिया पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणात जितेंद्र कोहळे (वय ४५) आणि कमलेश अशोक नेवारे (वय १९), दोघेही रा. टॉवरटोली, मुंडीपार, यांना ताब्यात घेण्यात आले असून, दोन विधिसंघर्ष बालकांचाही सहभाग असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविशंकर रहांगडाले हे २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी व्यंकटेश राईस मिल, एमआयडीसी मुंडीपार येथे रात्रीच्या पाळीच्या कामासाठी मोटारसायकलने घरून निघाले होते. दरम्यान, चमडा फॅक्टरीजवळील रस्त्यावर अज्ञात व्यक्तीने त्यांच्या डोक्यावर धारदार हत्याराने वार करून त्यांची हत्या केली. याप्रकरणी त्यांचा मुलगा विक्की रविशंकर रहांगडाले यांच्या तक्रारीवरून गंगाझरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४७०/२०२६, कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, मृतक जादूटोणा करीत असल्याची गावात चर्चा होती आणि काही व्यक्तींमध्ये त्यांच्याबद्दल रोष होता.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी कमलेश नेवारे याला ताब्यात घेऊन चौकशी केली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, चौकशीत त्याने मृतकावर जादूटोणा केल्याचा संशय असल्याचे सांगितले. त्याच्या कुटुंबातील तसेच परिसरातील काही व्यक्तींच्या मृत्यू व आजारपणासाठी मृतक जबाबदार असल्याचा संशय आरोपींना होता, अशी माहिती तपासात समोर आल्याचे पोलिसांनी नमूद केले.

पोलिसांच्या तपासानुसार, याच संशयातून कमलेश नेवारे, जितेंद्र कोहळे आणि दोन विधिसंघर्ष बालकांनी रविशंकर रहांगडाले यांच्या हत्येचा कट रचल्याचे निष्पन्न झाले. २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी एमआयडीसी मार्गावर आरोपी दबा धरून बसले होते. रहांगडाले मोटारसायकलने जात असताना त्यांचा पाठलाग करून चमडा फॅक्टरीजवळ त्यांना अडवण्यात आले. त्यानंतर हातोड्याने मारहाण करून त्यांना खाली पाडले आणि कुऱ्हाडीने डोक्यावर वार केल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत जितेंद्र कोहळे आणि कमलेश नेवारे यांना ताब्यात घेण्यात आले असून, पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्यांना गंगाझरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास गंगाझरी पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन गुल्हाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांची उपासमार

### चार महिन्यांपासून मानधन रखडले

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद व खाजगी अनुदानित शाळेमधील विद्यार्थ्यांना सकस व पोषणयुक्त आहार मिळावा, यासाठी शासनामार्फत शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येते. विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार शिजविण्याची जबाबदारी गावातीलच बचत गटातील महिलांवर सोपविण्यात आली असून, त्यांची नियुक्ती मानधनाच्या तत्त्वावर करण्यात आलेली आहे. मात्र, अत्यल्प मानधन आणि त्यातही वेळेवर मानधन मिळत नसल्याने या कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिवसभर शाळेत थांबणे, धान्य स्वच्छ करणे, सकस आहार तयार करणे, आहार शिजविताना योग्य ती काळजी घेणे, शालेय पोषण आहारासाठी उपलब्ध धान्याची निगा राखणे तसेच स्वयंपाकघर व परिसराची स्वच्छता करणे आदी विविध कामे करावी लागतात. या कामाच्या मोबदल्यात त्यांना दरमहा केवळ २,५०० रुपये मानधन मिळते.

अत्यल्प मानधनावर काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांना सध्या मानधन वेळेवर मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने इतर रोजगाराच्या संधीही कमी झाल्या आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहार योजनेतून मिळणाऱ्या मानधनावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याची वेळ या कर्मचाऱ्यांवर आली आहे.

मात्र, जुलै २०२६ पासून या कर्मचाऱ्यांना मानधन मिळालेले नसल्याची माहिती आहे. याबाबत वरिष्ठ स्तरावर चौकशी केली असता, अद्याप अनुदान प्राप्त झाले नसल्याने मानधन अदा करण्यात आले नसल्याचे सांगण्यात येत आहे. तुटपुंज्या मानधनावर काम करूनही त्याचा मोबदला वेळेवर मिळत नसल्याने या कर्मचाऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

दरम्यान, शासनाने शालेय पोषण आहार योजनेच्या आर्थिक



व्यवहारासाठी नवीन स्पर्श प्रणाली सुरू केली असून, या प्रणालीद्वारे शालेय पोषण आहाराचे अनुदान मुख्याध्यापकांच्या खात्यावर जमा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, एप्रिल २०२६ पासून शालेय पोषण आहाराचे अनुदान मुख्याध्यापकांना प्राप्त झालेले नसल्याचे सांगण्यात येत आहे. वाढती महागाई आणि उपलब्ध निधीचा अभाव यामुळे विद्यार्थ्यांसाठी पोषण आहाराची व्यवस्था करणे मुख्याध्यापकांसाठीही आर्थिकदृष्ट्या अडचणीचे ठरत आहे.

शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या कर्मचाऱ्यांचे रखडलेले मानधन तसेच मुख्याध्यापकांनी स्वतःच्या स्तरावर केलेला खर्च शासनाने तातडीने अदा करावा, अशी मागणी होत आहे. निधीअभावी योजना राबविताना मुख्याध्यापकांसह पोषण आहार कर्मचाऱ्यांनाही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

> शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मानधन तसेच मुख्याध्यापकांनी खर्च केलेली रक्कम शासनाने लवकरात लवकर अदा करावी. शासनाच्या अनेक योजना आहेत; परंतु त्यासाठी निधीच उपलब्ध नसल्याची परिस्थिती दिसून येत आहे. यात मुख्याध्यापकांचा नाहक बळी जात आहे. त्यामुळे शासनाने एकतर ही योजना मुख्याध्यापकांकडून बाजूला करावी किंवा त्यांना वेळच्या वेळी पोषण आहार शिजविण्यासाठी लागणारी रक्कम अदा करावी.
>
> **– विरेंद्र वाघमारे**
> **सरचिटणीस,**
> **अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, जिल्हा नागपूर**

# रामटेकमध्ये गणेश मंडळांच्या मूर्ती व सजावट भव्य स्पर्धेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

गणेशोत्सवातील कलात्मकता, सर्जनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता पार्टी, रामटेक विधानसभा क्षेत्राच्यावतीने श्री गणेश मंडळ - श्री मूर्ती व सजावट भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत रामटेक विधानसभा क्षेत्रातील गणेश मंडळांना सहभागी होता येणार असून, गणेशमूर्तीची कलात्मकता, मंडप व सजावटीची कल्पकता, देखाव्याची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी, सामाजिक व शैक्षणिक संदेश, पर्यावरणपूरक गणेशोत्सव, स्वच्छता व सुरक्षेची व्यवस्था, भारतीय संस्कृती व परंपरेचे जतन, सामाजिक एकोपा तसेच मंडळाचे शिस्तबद्ध नियोजन आदी बाबींच्या आधारे परीक्षण करण्यात येणार आहे. व तसेच सर्व बक्षीस आहे माजी आमदार डी मलिकार्जुन रेड्डी यांच्यातर्फे राहणार आहे.

स्पर्धेतील विजेत्या मंडळांसाठी आकर्षक रोख पारितोषिके ठेवण्यात आली असून प्रथम क्रमांक ५१ हजार, द्वितीय ३१ हजार, तृतीय २१ हजार, चतुर्थ ११ हजार तर पंचम क्रमांकासाठी ७ हजारांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच सहभागी मंडळांना २५०१ प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी जाहीर केले आहे. स्पर्धेसाठी १४ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत अर्ज प्रक्रिया ठेवण्यात आली होती. गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवसापासून पाचव्या दिवसापर्यंत मंडळांच्या मूर्ती, सजावट व देखाव्याचे परीक्षण करण्यात येणार आहे. स्पधेर्तील सर्वोच्च पारितोषिकांचे वितरण मंगळवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांच्या जनसंपर्क कार्यालय, किराड भवन, गांधी चौक, रामटेक येथे करण्यात येणार असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे. या उपक्रमातून गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता कला, संस्कृती, सामाजिक एकोपा, जनजागृती आणि पर्यावरण संवर्धनाचा उत्सव व्हावा, हा उद्देश असल्याचे आयोजक मा. डी. मल्लिकार्जुन रेड्डी, माजी आमदार रामटेक विधानसभा यांनी सांगितले.

# इमाव, विजाभज आणि विमाप्र विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना तसेच पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयं योजनेअंतर्गत व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात मुदतवाढ देण्यात आली आहे. शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता इतर मागास प्रवर्गातील मुलां-मुलींसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत मुलां-मुलींच्या वसतिगृहांमध्ये तसेच आधार व स्वयं योजनेअंतर्गत १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल. गुणवत्ता यादीनुसार वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाचा लाभ मिळाला नाही, त्यांचे अर्ज ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयं योजनेमध्ये रूपांतरित करण्यात येतील. शासनाच्या संकेतस्थळावर काही तांत्रिक अडचणी उद्भवल्या होत्या. परिणामी १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या व्यावसायिक व अव्यावसायिक विद्यार्थ्यांना अर्ज सादर करता आले नव्हते.

ही अडचण लक्षात घेऊन प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या मुदतवाढीनुसार सर्व विद्यार्थ्यांनी वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयं योजनेअंतर्गत अर्ज भरून त्या अर्जाची प्रत व आवश्यक कागदपत्रे संबंधित वसतिगृहात किंवा कार्यालयात सादर करावीत. जिल्ह्यातील इमाव, विमाप्र आणि विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी वसतिगृह तसेच आधार व स्वयं योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी इतर मागास वर्ग मुलां-मुलींचे वसतिगृह, नागपूर येथील गृहपाल तसेच सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, नागपूर या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक संचालक रोहन कांबळे यांनी केले आहे.

# पंडित राजेंद्र गंगानी यांच्या कथ्थकच्या पदन्यासाने भारावले रसिक

### स्पिक मॅके प्रस्तुत विरासत-हेरिटेज फेस्टला प्रारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जयपूर घराण्याचे ज्येष्ठ कथ्थक गुरु पंडित राजेंद्र गंगानी यांच्या भावमुद्रा, लयकारी, उठान आणि दमदार पदन्यासाने रसिक मंत्रमुग्ध झाले. विविध ताल-लयींच्या आविष्कारातून त्यांनी कथ्थकच्या समृद्ध परंपरेचे दर्शन घडविले.

भारतीय शास्त्रीय कला आणि सांस्कृतिक परंपरेची ओळख युवा पिढीला करून देण्याच्या उद्देशाने स्पिक मॅके, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार आणि विश्वेश्वरया नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीएनआयटी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय विरासत-हेरिटेज फेस्टला गुरुवारी उत्साहात प्रारंभ झाला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गणेशवंदना सादर करण्यात आली. यावेळी कथ्थक गुरु पंडित राजेंद्र गंगानी, डॉ. स्नेह गंगल, राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त कलाकार, व्हीएनआयटीचे डीन डॉ. उमेश देशपांडे आणि संचालक प्रा. प्रेमलाल पटेल उपस्थित होते.

पंडित राजेंद्र गंगानी यांनी गजवदन आणि गजमुख या गणेश स्तुतीतील भावमुद्रांनी सादरीकरणाला सुरुवात केली. त्यानंतर विविध मात्रा आणि तालांमधून उपज अंग सादर करत त्यांनी आपल्या नृत्यकौशल्याची झलक दाखवली. स्वर आणि लयींच्या उठानानंतर त्यांनी बेदम तिहाई सादर केली. निसर्गातील ध्वनी आणि विविध वाद्यांचे आवाज यांचा सुरेख मिलाफ असलेले कवित्त आणि परमेलू तसेच पायांच्या तत्कारातून डमरूच्या नादाचा चढ-उतार अनुभवता येईल अशी डमरू तिहाई विशेष दाद मिळवून गेली.

यानंतर कारी जो घरसे या ठुमरीतून राधा-कृष्णाच्या लीला, गोपींची छेडछाड, होळीचे रंग, सावनातील निसर्ग आणि प्रियकराच्या प्रतीक्षेत असलेल्या विरही नायिकेच्या भावना त्यांनी प्रभावीपणे साकारल्या. द्रुत लयातील बंदिशीनंतर झालेल्या जुगलबंदीने कार्यक्रमाची रंगत आणखी वाढली.



समीउल्लाह खान (हिंदुस्थानी शास्त्रीय गायक व संवादिनी वादक), मोहम्मद अयुब खान (सारंगी), पंडित फतेह सिंग गंगानी (तबला) आणि दीप्ती गुप्ता (कथ्थक नृत्यांगना व दीप्तीम डान्स अँड कल्चरल फाउंडेशनच्या संस्थापक) यांच्या सुरेल आणि लयबद्ध साथीने सादरीकरण अधिक खुलले.

यावेळी प्रा. प्रेमलाल पटेल यांनी स्पिक मॅकेच्या माध्यमातून भारतीय शास्त्रीय कला व संस्कृती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. डॉ. उमेश देशपांडे आणि प्रा. विराजकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करणारे डॉ. आनंद मिश्रा व डॉ. सारिका बहादुरे तसेच पंडित राजेंद्र गंगानी आणि त्यांच्या सांस्कृतिक चमूचे त्यांनी अभिनंदन केले.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी आयोजित मिनिएचर चित्रकला कार्यशाळेलाही आर. एस. मुंडले शाळेतील तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश यांनी केले. प्रस्तावना ओम मानकामे यांनी केली, तर आभार डॉ. सारिका बहादुरे यांनी मानले.

**आज विरासतमध्ये**

शुक्रवार, २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता विदुषी कलापिनी कोमकली यांचे हिंदुस्थानी शास्त्रीय गायन होणार आहे. त्यापूर्वी त्या विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळाही घेणार आहेत.

---

**थोडक्यात**

## विदर्भ साहित्य संघ आणि सर्जना निर्माणतर्फे रविवारी निसर्गचित्रांवरील व्याख्यानमाला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघ आणि सर्जना निर्माण यांच्या संयुक्त विद्यमाने




आयोजित चित्र -शिल्प रसग्रहणाच्या व्याख्यानमालेचा ३० वा कार्यक्रम रविवार,दिनांक २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ .०० वाजता शासकीय चित्रकला आणि अभिकल्प महाविद्यालय (दीक्षाभूमी समोर,लक्ष्मीनगर )येथे होईल. "निसर्ग बिलोरी ऐना " या शीर्षकाखाली होणाऱ्या या व्याख्यानमालेत विविध निसर्गचित्रांवर भाष्य होईल. ज्येष्ठ नाटककार डॉ.पराग घोंगे "नंदलाल बोस आणि शांतिनिकेतन परिसर" या विषयावर आपले मनोगत व्यक्त करतील तर,"नाशिक दरवाजा आणि पाच चित्रकार" हा विषय चित्रकार डॉ.विश्वनाथ साबळे मांडतील. "एडवर्ड मोने आणि वॉटर लिलीज" या विषयावर ज्येष्ठ चित्रकार आणि कलासमीक्षक प्रा.चंद्रकांत चन्ने मनोगत व्यक्त करतील .या कार्यक्रमास नागरिक आणि चित्ररसिकांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जागतिक पर्यटन दिनानिमित्त २६ सप्टेंबरला 'मूनलाइट वॉक', सीएसी ऑलराऊंडरचा अनोखा उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त सीएसी ऑलराऊंडरतर्फे विद्यार्थ्यांसाठी २६ सप्टेंबर रोजी अनोख्या मूनलाइट वॉक आणि कॅम्पिंग-ट्रेकिंगचे आयोजन करण्यात आले आहे. चांदण्यांच्या प्रकाशात निसर्गाचा अनुभव घेत विद्यार्थ्यांना साहस, निसर्ग आणि अनुभवाधारित शिक्षणाची अनोखी सांगड घालण्याची संधी या उपक्रमातून मिळणार आहे. याच उपक्रमात २७ सप्टेंबरला सकाळी हेरिटेज वॉक, तर दुपारी डिझास्टर मॅनेजमेंट सेशन आणि कयाकिंगचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आशिष जयस्वाल असणार आहेत. मूनलाइट कॅम्पिंग व ट्रेकिंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रात्रीच्या निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेताना आत्मविश्वास, नेतृत्वगुण, टीमवर्क आणि निसर्गाविषयी जागरूकता विकसित करण्याची संधी मिळणार आहे. हेरिटेज वॉकमधून स्थानिक इतिहास, वास्तुकला आणि सांस्कृतिक वारशाची ओळख करून दिली जाणार आहे.

डिझास्टर मॅनेजमेंट सेशनमध्ये आपत्कालीन परिस्थितीत प्राथमिक तयारी, सुरक्षितता, टीमवर्क आणि जबाबदार प्रतिसाद याबाबत मार्गदर्शन केले जाईल. कयाकिंगमधून विद्यार्थ्यांना साहसी जलक्रीडेचा अनुभव मिळण्यासोबतच एकाग्रता, समन्वय, आत्मविश्वास आणि जलसुरक्षेचे महत्त्व समजणार आहे..

## 'भारताची मिसाईल वूमन' डॉ. टेसी थॉमस यांचे २८ रोजी व्याख्यान

### अभियंता दिनानिमित्त इंजिनीयर्स फोरमचे विशेष आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारताचे महान अभियंता भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या



यांच्या जयंतीनिमित्त देशभरात दरवर्षी १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिन साजरा केला जातो. त्यानिमित्ताने, इंजिनीयर्स फोरमच्यावतीने सोमवार, २८ सप्टेंबर रोजी भारताची मिसाईल वूमन म्हणून परिचित असलेल्या एरोनॉटिकल इंजिनिअर डॉ. टेसी थॉमस यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. यंदाच्या अभियंता दिनाची संकल्पना 'भारताच्या संरक्षण क्षेत्रात एआयची भूमिका' अशी आहे. वनामती हॉल, व्हीआयपी रोड, ट्रॅफिक पार्क, धरमपेठ, नागपूर येथे सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर राहतील. या कार्यक्रमाला १०० हून अधिक संस्थांमधील सुमारे १,८०० अभियंते उपस्थित राहणार आहेत.

डॉ. टेसी थॉमस या अग्नी क्षेपणास्त्र प्रणालीच्या विकासातील महत्त्वपूर्ण योगदानासाठी ओळखल्या जातात. त्या यावेळी 'भारताच्या संरक्षण क्षेत्रात एआयची भूमिका' या विषयावर बीज भाषण करणार आहेत. डॉ. थॉमस यांचा क्षेपणास्त्र संरक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल जीवनगौरव सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन इंजिनीयर्स फोरमचे अध्यक्ष पी. के. कुलकर्णी यांनी केले आहे.

## पेन्शनधारकांच्या विविध मागण्यांसाठी २९ व ३० सप्टेंबरला धरणे आंदोलन

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

केंद्र व राज्य शासनाच्या पेन्शनविषयक धोरणांविरोधात तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, गोंदिया जिल्हा यांच्यावतीने आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. संघटनेने जारी केलेल्या पत्रकानुसार, निवृत्त अधिकारी, कर्मचारी तसेच निवृत्त शिक्षकांच्या पेन्शनविषयक प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २९ व ३० सप्टेंबर २०२६ रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. आंदोलनानंतर पंतप्रधानांना निवेदन देण्यात येणार असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

पत्रकात केंद्र सरकारच्या पेन्शनविषयक निर्णयांमुळे निवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला आहे. आठवा वेतन आयोग, महागाई भत्ता व पेन्शनमधील महागाई वाढीचा लाभ यांसह विविध मागण्यांचा त्यात उल्लेख आहे. आंदोलनाच्या नियोजनासाठी शनिवार, २६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, तळमजला, जयस्तंभ चौक, गोंदिया येथे होणार आहे. या बैठकीस जिल्ह्यातील सर्व सेवा निवृत्त अधिकारी-कर्मचारी, निवृत्त शिक्षक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेने केले आहे.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२६

थोडक्यात

## वाडी परिसरात पर्यावरण पूरक गणेशोत्सव

### आमदार समीर मेघे यांची भेट



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

वाडी परिसरात गेल्या आठ दिवसापासून अतिशय शांततेत तसेच पर्यावरण पूरक व भक्तिमय वातावरणात गणेशोत्सव साजरा होत आहे.वाडी पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या दिशा निदेर्शानुसार सर्व गणेशोत्सव मंडळ पालन करीत असल्याचे दिसून येत आहे. दि.२३ सप्टेंबर ला क्षेत्राचे आमदार समीर मेघे यांनी वाडी परिसरातील एकूण १० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला भेट दिली. ध्वनी प्रदूषण रहित उत्सव साजरा करण्यात येत असल्याने सर्व मंडळ पदाधिकारी यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी नगराध्यक्ष नरेश चरडे, नगरसेविका संगीता बावणे, सभापती दिनेश कोचे, विजय मेंढे,आनंद कदम, केशव बांदरे,नगरसेवक हर्षल काकडे, नगरसेविका पूर्वा काकडे, कमल कनोजे, सामाजिक कार्यकर्ते गुरुदास बावणे, राकेश मिश्रा प्रामुख्याने उपस्थित होते.संपूर्ण गणेशोत्सव दरम्यान परिसरात वाडी पोलीस निरीक्षक नितीन मगर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात येत आहे.

## डॉ. सुनंदा जुलमे यांच्या ग्रंथांचा प्रकाशन सोहळा संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. सुनंदा बोरकर जुलमे यांचे 'मरुभूमीतील नंदनवनः दुबई' हे प्रवासवर्णन आणि 'स्त्री एल्गाराची कविता' या अनुवादित कवितासंग्रहाचे प्रकाशन दिनांक २०-९-२६ ला उरुवेला कॉलनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉन्फरन्स सभागृह येथे पार पडले. 'मरुभूमीतील नंदनवनः दुबई' हे प्रवासवर्णन लेखिकेच्या प्रामाणिक अनुभव कथनामुळे निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे, असे वक्तव्य अध्यक्षपदावरून बोलताना जेष्ठ साहित्यिक डॉ?. विमल थोरात यांनी केले. 'स्त्री एल्गाराची कविता' हा अनुवादित कवितासंग्रह प्रज्ञा बाली यांच्या 'नजरिया स्त्रीवादी' या हिंदी काव्यसंग्रहाचा आशयानुवर्ती अनुवाद असून या कविता मराठी भाषेत स्वतंत्र मूल्याने निश्चित अधोरेखित होतील असे प्रतिपादन जेष्ठ कवी लेखक इ. मो. नारनवरे यांनी दोन्ही ग्रंथांचे प्रकाशन करताना केले.

या प्रकाशन सोहळ्यात प्रसिद्ध लेखिका नेहा गोडघाटे आणि प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी स्त्री एल्गाराची कविता' या ग्रंथावर सविस्तर भाष्य केले. डॉ. जुलमे यांनी मूळ हिंदी कवितेतील स्त्रीविश्वाची अनुभूती जशीच्या तशी अनुवादात मांडली, हे या अनुवादाचे बलस्थान आहे, असे डॉ. शेलेंद्र लेंडे यांनी या पुस्तकावर भाष्य करताना म्हटले आहे. भूपेश पाटील यांनी 'मरुभूमीतील नंदनवनः दुबई' हे पुस्तक लेखिकेने कमालीच्या निरीक्षणक्षमतेने लिहिले आहे, असे उद्गार काढले आणि प्रवासवर्णनातील अनेक रम्य स्थळांची नोंद घेतली.

ग्रंथ प्रकाशन कार्यक्रमाला डॉ. मदन कुलकर्णी, जावेद पाशा, अरुणा सबाने, लोकनाथ यशवंत, विलास गजभिये, डॉ. भास्कर गणवीर, प्राचार्य डॉ. अशोक काळे, डॉ. वसुधा वैद्य, मीनल येवले, सचिन सुकलकर, राजेश्री खोब्रागडे, शालिक जिल्हेकर, डॉ. अजय चिकाटे, डॉ. विनोद राऊत, सुरेश आकोटकर, सुजाता लोखंडे, विमल शेंडे अशी साहित्यिक, रसिक मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती. सुनिता रामटेके, अनिता वानखेडे, प्रतिभा सहारे यांनी 'हो सबला नारी... घे उंच भरारी...' हे नारीशक्तीचे प्रेरक गीत सादर केले. उत्तम सूत्रसंचालन डॉ. वीणा राऊत नारनवरे यांनी केले. प्रणोती कळमकर यांनी आभार मानले.

## राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे विद्यार्थी घडवणारी संस्कार शाळा : डॉ. शरद पोकळे



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

येथील श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालयात आज, २४ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन कनिष्ठ व वरिष्ठ युनिटच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्थापना दिनाचे औचित्य साधून 'महाविद्यालय परिसर स्वच्छता अभियाना' अंतर्गत प्लास्टिक मुक्ती व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. दिलीप जेना उपस्थित होते. या अभियानात महाविद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवकांना महाविद्यालयाच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. शरद पोकळे म्हणाले, "राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ एक उपक्रम नसून विद्यार्थ्यांना आदर्श नागरिक घडवणारी संस्कार शाळा आहे. स्वच्छता आणि सामाजिक भान यातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ होते."

# एका क्षणाच्या निर्णयाने वाचले, दोन जीव!

### एका छोट्याशा गावातील ती मध्यरात्रीची वेळ



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

घरातील सर्वजण गाढ झोपले होते. कोणालाही कल्पना नव्हती की काही क्षणांतच या घरावर मोठे संकट कोसळणार आहे. रात्री साधारण २ वाजता दोन मण्यार साप घरात शिरले. त्यातील एका सापाने घरातील अवघ्या १७ वर्षांच्या तुषारला दंश केला. मात्र दंश झाल्याचे गांभीर्य त्याला जाणवले नाही आणि त्याने त्याकडे दुर्लक्ष करून पुन्हा झोप घेतली. काही वेळाने त्याच सापाने तुषारच्या वडिलांनाही दंश केला. घरच्यांना नेमके काय झाले आहे हे समजत नव्हते. काहीतरी चावल्याचा संशय आल्याने त्यांनी घरात शोध घेतला. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की घरात दोन मण्यार साप आहेत. परंतु संकटाच्या त्या क्षणीही कुटुंबाने तातडीने रुग्णालयात जाण्याऐवजी गावातील झाडफुकीचा आधार घेतला. या प्रक्रियेत तब्बल २-३ तासांचा अमूल्य वेळ निघून गेला. तोपर्यंत तुषारची प्रकृती झपाट्याने खालावत होती.

शेवटी तुषारचे काका आणि परिसरातील काही लोकांनी तुषार आणि त्याच्या वडिलांना जवळच्या रुग्णालयात नेले. तेथून परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे सांगून त्यांना तातडीने मोठ्या उपचार केंद्रात जाण्याचा सल्ला देण्यात आला.

**सकाळी साधारण ६ वाजता**

तुषार आणि त्याचे वडील आदित्य हॉस्पिटल, सावनेर येथे पोहोचले. तुषारची अवस्था अत्यंत गंभीर होती. तो धापा टाकत, श्वास घेण्यासाठी संघर्ष करत असलेल्या अवस्थेत होता. परिस्थिती अशी होती की पुढचा प्रत्येक क्षण त्याच्या आयुष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. डॉ. अमित बाहेती, डॉ. अंकिता बाहेती, डॉ. श्रीकांत भोंडे, डॉ. उपदेश मोटघरे आणि संपूर्ण आदित्य हॉस्पिटलच्या टीमने क्षणाचाही विलंब न करता उपचार सुरू केले. तुषारची स्थिती इतकी गंभीर झाली की त्याला तातडीने श्वसननलिकेत नळी टाकून कृत्रिम श्वसनाची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर त्याला हृदय-फुफ्फुस पुनरुज्जीवन प्रक्रिया म्हणजेच सीपीआर देण्यात आला.

काही काळासाठी तुषारची परिस्थिती अशी निर्माण झाली होती की त्याचा जीव धोक्यात आला होता. मात्र डॉक्टर आणि संपूर्ण टीमच्या अथक प्रयत्नांमुळे तुषारला पुन्हा शुद्धीवर आणण्यात आणि त्याचे प्राण वाचवण्यात यश आले.

त्यानंतर सर्पदंशावरील आवश्यक प्रतिविष औषध म्हणजेच अँटी-स्नेक व्हेनम देण्यात आले. मण्यारच्या दंशामुळे शरीरातील नसांवर परिणाम होऊन स्नायूंचा पक्षाघात आणि श्वसनक्रिया बंद पडण्याचा धोका असतो. हा धोका लक्षात घेऊन तुषारवर आवश्यक उपचार करण्यात आले. डॉक्टरांच्या सततच्या देखरेखीखाली न्युओस्टिग्मिन हे औषध आवश्यक मात्रेत देण्यात आले. तुषारला पुढील उपचारांसाठी कृत्रिम श्वसनयंत्रावर ठेवण्यात आले. विशेष म्हणजे, तुषारच्या शेजारच्या खाटेवर त्याचे वडीलही उपचार घेत होते. एका घरातील वडील आणि त्यांचा अवघा १७ वर्षांचा एकुलता एक मुलगा–दोघेही मण्यारच्या दंशामुळे मृत्यूशी झुंज देत होते. परिस्थिती अत्यंत गंभीर होती. पण डॉक्टर आणि संपूर्ण टीमच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले.

तुषारला जवळपास दोन दिवस कृत्रिम श्वसनयंत्रावर ठेवण्यात आले. अखेर त्याने डोळे उघडले आणि तो शुद्धीवर आला. पुढील उपचार सुरू ठेवण्यात आले आणि एकूण पाच दिवसांच्या उपचारानंतर तुषार आणि त्याचे वडील दोघेही सुखरूप होऊन घरी परतले.

**तो क्षण, कधीही न विसरणारा!**

तुषार आणि त्याचे वडील सुखरूप घरी जात असताना रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी आणि संपूर्ण टीमच्या चेहऱ्यावर समाधान होते. पण त्याहून मोठा आनंद होता तो त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर. काही दिवसांपूर्वी मृत्यूच्या दारात उभे असलेले दोन जीव आज पुन्हा आपल्या कुटुंबासोबत घरी जात होते. रुग्णालयातून घरी जाताना तुषारच्या कुटुंबीयांनी डॉ. अमित बाहेती, डॉ. अंकिता बाहेती, डॉ. श्रीकांत भोंडे, डॉ. उपदेश मोटघरे आणि संपूर्ण आदित्य हॉस्पिटलच्या टीमचे मनापासून आभार मानले. त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते. कारण त्यांना त्यांचे दोन जीव पुन्हा मिळाले होते. त्या कुटुंबाच्या चेहऱ्यावरचा आनंद कोणत्याही संपत्तीपेक्षा, कोणत्याही यशापेक्षा मोठा होता.

**या घटनेतून एक महत्त्वाचा संदेश...**

आज विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्र खूप पुढे गेले आहे. सर्पदंश ही अत्यंत गंभीर वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती आहे. अशा वेळी प्रत्येक मिनिट महत्त्वाचे असते. अनेक ग्रामीण भागांमध्ये आजही सर्पदंश झाल्यानंतर झाडफूक, मांत्रिक किंवा इतर अंधश्रद्धेच्या उपचारांचा आधार घेतला जातो. या घटनेतही २-३ तासांचा अमूल्य वेळ झाडफुकीमध्ये गेला. त्या विलंबानंतर तुषारची अवस्था इतकी गंभीर झाली की त्याला श्वसननलिकेत नळी टाकणे, सीपीआर देणे, कृत्रिम श्वसनयंत्रावर ठेवणे आणि तातडीचे वैद्यकीय उपचार करावे लागले. जर तुषार आणि त्याचे वडील वेळेत रुग्णालयात पोहोचले नसते, तर कदाचित एका कुटुंबाला आपल्या घरातील दोन महत्त्वाच्या व्यक्तींना गमावण्याची वेळ आली असती.

म्हणून लक्षात ठेवा, सर्पदंश झाला तर झाडफूक नाही. अंधश्रद्धा नाही. वेळ वाया घालवू नका. तात्काळ रुग्णालयात जा आणि डॉक्टरांचा सल्ला घ्या. वेळेवर घेतलेला एक निर्णय आयुष्य वाचवू शकतो. अंधश्रद्धेपासून दूर राहा. सावध रहा. वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारा आणि आपल्या प्रियजनांचे प्राण वाचवा, असे आवाहन डॉ. अमित बाहेती

डॉ. अंकिता बाहेती आणि तसेच संपूर्ण आदित्य हॉस्पिटल टीम यांनी केले आहे.

## वाडी एसटीपी प्रकल्पाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

### आठ दिवसांत चाचणी घेऊन प्रकल्प कार्यान्वित करण्याचे निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वाडी नगरपरिषदेमार्फत उभारण्यात येत असलेल्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची (एसटीपी) नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सद्यस्थितीचा आढावा घेतला. येत्या आठ दिवसांत प्रकल्पाची चाचणी व आवश्यक तपासणी पूर्ण करून प्रकल्प तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणेला दिले.

वाडी शहरातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करून त्यावर प्रक्रिया केल्यानंतरच ते पुढे सोडण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रकल्पाच्या कामात झालेल्या विलंबाची दखल घेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या. दिलेल्या मुदतीत कामे पूर्ण व दर्जेदार करण्याबाबत संबंधित कंत्राटदाराना निर्देश दिले.

सांडपाणी व्यवस्थापनातील महत्त्वाचा टप्पा असलेले, नाल्यातून वाहून जाणारे सांडपाणी जॅकवेलमध्ये एकत्रित करण्याचे काम पूर्ण झाले आहे. पाहणीदरम्यान पंपिंग यंत्रणा सुरू करून पाणी जॅकवेलमध्ये घेण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. जॅकवेलमधून हे पाणी पुढील प्रक्रियेसाठी एसबीआर (सिक्वेन्सिंग बॅच रिक्टर) आधारित सेटलिंग टँकमध्ये नेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

प्रकल्पासाठी आवश्यक असणारे वीज जोडणीचे काम पूर्ण झाले असून आवश्यक सर्व यंत्रसामग्री व संयंत्रे बसवण्यात आली आहेत. उर्वरित तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून प्रकल्प लवकरात लवकर सुरू करण्यावर प्रशासनाचा भर आहे. या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पामुळे वाडी शहरातील नाल्यांमधून वाहून जाणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया होऊन ते शुद्ध स्वरूपात पुढे सोडण्यात येईल. परिणामी नागपूर शहरातील अंबाझरी तलावात जाणाऱ्या प्रदूषित पाण्याचे प्रमाण घटून जलप्रदूषण तसेच जलपर्णीच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यास मोठी मदत होणार आहे. अंबाझरी तलावाच्या पर्यावरणीय संवर्धनाच्या दृष्टीनेही हा प्रकल्प महत्त्वपूर्ण असल्याने कोणत्याही परिस्थितीत विलंब न करता तो पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

या पाहणीच्या वेळी वाडी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष नरेश चरडे, बांधकाम सभापती, पाणीपुरवठा अभियंता, विद्युत अभियंता, मुख्याधिकारी विनोद जाधव यांच्यासह प्रकल्पाचे कंत्राटदार, प्रकल्प व्यवस्थापक, सल्लागार तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## संदीप ढिवरूजी गायकवाड यांना मराठी विषयात पीएचडी पदवी जाहीर



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कोलार केंद्र बुटीबोरी येथील प्रभारी मुख्याध्यापक संदीप ढिवरूजी गायकवाड यांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीकडून नुकतीच मराठी साहित्य या विषयात पीएचडी पदवी जाहीर झाली आहे. त्यांनी आपला शोधनिबंध यशवंत मनोहर यांच्या कवितेतील मानवतावाद :एक चिकित्सक अभ्यास या विषयावर सादर केला होता. त्यांनी हे संशोधन डॉ. अनमोल शेंडे गोविंदराव वारजूकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभीड जि.चंद्रपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. त्यांच्या या संशोधकाने आंबेडकरवादी कवितेला नवी दिशा मिळेल. तसेच डॉ. यशवंत मनोहरांच्या कवितेतील मानवतावाद समाजाला कसा उपयोगी आहे हे सुद्धा समजून येईल .

त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्यांचे प्राचार्य डॉ.संजयसिंग, मार्गदर्शक डॉ. अनमोल शेंडे, वनिता शेंडे, डॉ.रुपेश कराडे, दिलीप गायकवाड, शाळेतील सर्व शिक्षक वृंद, केंद्रातील सर्व शिक्षकवृंद महात्मा फुले बचत गट दिघोरी नागपूर येथील सर्व मित्र परिवार व कुटुंबातील सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले. भविष्यात या संशोधनाचा उपयोग संशोधकांना नक्कीच होईल अशा आशावाद त्यांनी व्यक्त केले आहे.

# ध्वनी प्रदूषणाविरोधात गोंदिया पोलिसांची धडक कारवाई

### १३ आरोपींविरुद्ध ९ गुन्हे दाखल; डी.जे. साऊंड सिस्टिमसह २४ लाख ६४ हजारांचा मुद्देमाल जप्त



**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी गोंदिया पोलिसांनी जिल्ह्यात विशेष मोहीम राबवित डी.जे. चालक व मालकांविरोधात धडक कारवाई केली आहे. मागील दोन दिवसांत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ध्वनी प्रदूषण नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १३ आरोपींविरुद्ध एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, डी.जे. साऊंड सिस्टिम, बेस, टॉप, इको साऊंड सिस्टिम, साऊंड मिक्सर तसेच वाहनांसह एकूण २४ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक गौरख भामरे यांनी यापूर्वी लाऊडस्पीकर व डी.जे. चालक-मालकांची बैठक घेऊन सर्वोच्च न्यायालय व मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेर्शांची तसेच ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियमांची माहिती देत नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतरही नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला.

गोंदिया शहर : चावडी चौक, छोटा गोंदिया येथे मोठ्या क्षमतेच्या डी.जे. साऊंड सिस्टिमद्वारे निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आवाज केल्याप्रकरणी नंदकिशोर बुधराम राऊत (३८) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्याच्याकडून दोन बेस, दोन टॉप व जनरेटर असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

रामनगर पोलीस ठाणे : विद्यानगर, बी. टोली येथे राकेश भाऊराव गजभिये, अंकित महेंद्र नागोसे व हिरेश नंदलाल घारपिंडे यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून डी.जे. साऊंड सिस्टिमचे दोन बेस व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

आंबेडकर चौक, कुडवा येथे सोहेल सलीम शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून दोन बेस, दोन टॉप व १५ भोंगे असलेली साऊंड सिस्टिम तसेच चारचाकी वाहन असा ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. रेल्वे चौकीजवळ, कटांगीतोल्यात दिनेश देवीलाल भागत याच्याविरुद्ध कारवाई करून साऊंड सिस्टिम, मिक्सर व चारचाकी वाहन असा २ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गोंदिया ग्रामीण : ताडाटोली-अदासी येथे चंद्रप्रकाश दीनदयाळ भांडारकर व सचिन भांडारकर यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून चार बेस, चार टॉप, इको साऊंड सिस्टिम व टेम्पो असा २ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पांढराबोडी येथे तनुज कृष्णा यादव याच्याविरुद्ध कारवाई करून चार बेस, चार टॉप, १० सराफी लाईट व आयशर वाहन असा ३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गोरेगाव : पवन तलावाजवळ राकेश दीनदयाळ आगळे व तुषार मनोहर चव्हाण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्याकडून आठ बेस, आठ टॉप, इको साऊंड सिस्टिम, साऊंड मिक्सर, आयशर वाहन व झेनॉन पिकअप वाहन असा ८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

रावणवाडी : दासगाव येथे डी.जे. चालक दुर्गेश भोजराज तूरकर व मालक देवानंद बाबू कटरे यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून चार बेस, चार टॉप, इको साऊंड सिस्टिम, साऊंड मिक्सर, आयशर व झेनॉन पिकअप वाहन असा ४ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गणेश मंडळे व डी.जे. चालकांना पोलिसांचे आवाहन

ध्वनी प्रदूषणामुळे नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी गणेश मंडळे तसेच डी.जे. चालक व मालकांनी पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन गोंदिया पोलिसांकडून करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक गौरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेशचंद्र शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली गोंदिया शहरचे ठाणेदार प्रविण बोरकुटे, रामनगरचे ठाणेदार तिरुपती राणे, गोंदिया ग्रामीणचे ठाणेदार वैभव पवार, रावणवाडीचे ठाणेदार रामदास शेवते, गोरेगावच्या ठाणेदार वैशाली ढाले तसेच संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदारांनी केली.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२६

थोडक्यात

## दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांसाठी उत्तम नागरी सुविधा उभारण्याला प्राधान्य द्या : डॉ. विपीन

### मनपा आयुक्तांसह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केली दीक्षाभूमी परिसराची संयुक्त पाहणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दीक्षाभूमी परिसरात उभारण्यात येत असलेल्या सुरक्षा भिंतीची योग्य व मजबूत व्यवस्था करण्यात यावी. तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिन मुख्य समारंभ आणि इतर दिवशी देखील दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांना उत्तम सोयीसुविधा देण्यासह इतर नागरी सुविधांला प्राधान्य द्यावे, सर्व व्यवस्था १४ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करावी असे निर्देश मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मनपाद्वारे करण्यात येत असलेल्या व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी मनपा आयुक्त डॉ. विपीन आणि जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी गुरुवारी (ता.२४) दीक्षाभूमी परिसराला येथे भेट दिली. यावेळी प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे पदाधिकारी यांच्यासमवेत आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण परिसराची पाहणी केली.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम.,अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण माहेर, पोलीस उपायुक्त ऋषिकेश रेड्डी, मनपाचे अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, समाज कल्याण सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, मनपाच्या मुख्य अभियंता लीना उपाध्ये, उपायुक्त राजेश भगत, उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीचे सचिव डॉ. सुधीर फुलझेले, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, अधीक्षक अभियंता विजय गुरूबक्षाणी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, कार्यकारी अभियंता श्रीकांत वाईकर, राजेंद्र राठोड, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे गुल्हाने, मनपाचे सहायक आयुक्त धनंजय जाधव, अग्निशमन विभागाचे तुषार बारहाते, परिवहन प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी, स्मारक समितीचे प्रामुख्याने उपस्थित होते.

मनपा आयुक्त डॉ. विपीन आणि जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी इतर अधिकाऱ्यांसोबत दीक्षाभूमीचा संपूर्ण परिसर, मुख्य समारंभाचे ठिकाण, डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च येथील इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या जागेत तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय), सामाजिक न्याय भवन परिसरातील पार्किंगच्या जागेवर शौचालयाची व्यवस्था, अंबाझरी तलाव परिसर येथे उभारण्यात येणाऱ्या स्थानगृहासह इतर व्यवस्थेची पाहणी केली. मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी परिसरातील स्वच्छतागृहे, जमिनीचे समतलिकरण आणि एकूणच स्वच्छता व्यवस्थेची सखोल पाहणी केली. नागरिकांच्या सोयीसाठी सर्व यंत्रणा चोख ठेवावी. याशिवाय कारागृह परिसरातील सर्व आवश्यक व्यवस्था येत्या १४ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्यात यावी असेही निर्देश त्यांनी दिले. तर जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सर्व विभागांनी उत्तम समन्वय राखून नियोजित वेळेत कार्य करण्याच्या सूचना दिल्या.

## वेटलिफ्टिंग स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाचे वर्चस्व कायम



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

तनिष्क कॉलेज ऑफ नर्सिंग राजीव नगर नागपूर येथे संपन्न झालेल्या शालेय जिल्हास्तरीय वेटलिफ्टींग स्पर्धेत खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयातील ज्युदोपटूंनी स्पृहणीय कामगिरी करून आपापल्या वयोगट व वजनगटामध्ये प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त करुन वर्चस्व कायम ठेवले. १७ वर्ष वयोगटात मुलींमध्ये ६३ किलो खालील महिमा थुलकर प्रथम, ७७ किलो खालील पलक थुलकर प्रथम, १९ वर्ष वयोगटात मुलींमध्ये ५८ किलो खालील मृणाली ठाकरे प्रथम, १९ वर्ष वयोगटात मुलांमध्ये ६० किलो खालील नैतिक गौरखेडे प्रथम, ६५ किलो खालील मंथन ढोके प्रथम, ७९ किलो खालील स्वरीत गौरखेडे प्रथम, ९८ किलो खालील आदित्य वारकर प्रथम, ११० किलोवरील रेहान पाटिल प्रथम, तर श्रुती बावणे,हर्षीता मेश्राम, शंतनु ओकटे,प्रसिन मडके व पार्थ धिरडे यांना मात्र व्दितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

वरील सर्व प्राविण्य प्राप्त खेळाडूंना क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले. नागपूर येथे होणाऱ्या शालेय विभागीय वेटलिफ्टींग स्पर्धेत नागपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक व विश्वस्त सुनिलभाऊ केदार,अध्यक्ष सुधीर केदार, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे ,पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, धर्मेंद्र सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांनी विजयी वेटलिफ्टरचे अभिनंदन केले.

## बोखारा, शिवम ट्रेडर्स मध्दे काम करणाऱ्या व्यक्तीची गळफास घेऊन आत्महत्या

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

बोखारा लोणारा मार्गावरील शिवम ट्रेडर्स येथे तेथील काम करणाऱ्या कर्मचारी विजय पोपट पटोले वय ३७वर्ष, याने गळफास लाऊन आत्महत्या केली. विजय पोपट पाटोळे हा मूळचा फलटण जिल्हा सातारा येथील रहिवाशी आहे. शिवम ट्रेडर्स बोखारा येथे तो कामानिमित्त आलेहोते गळफास का घेतला याचे कारण अजून समजू शकले नाही. कोराडी पोलिस निरीक्षक धुमाळ, सहायक पोलिस निरीक्षक, आणि इतर स्टाफ कसुन तपास करीत आहेत.

# पारशिवनी तालुक्यात कोतवाल भरतीत घोळ!

## भज.(ब) ला डावलले, चिठ्ठी टाकून आरक्षण, ढिवर समाज संघटना आक्रमक




**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी तालुक्यातील १० महसूल साजांसाठी घेण्यात आलेल्या कोतवाल पदभरतीच्या आरक्षण सोडतीत मोठा सावळा गोंधळ झाल्याचा आरोप महाराष्ट्र ढिवर समाज कल्याण संघ, नागपूर यांनी केला आहे. या भरतीमध्ये भटक्या जमाती-ब प्रवगार्ला एकही जागा न देणे, तसेच शासन निर्णय डावलून गावाच्या चिठ्ठ्या प्लास्टिकच्या डब्यात टाकून आरक्षण ठरवणे यासारखे गंभीर प्रकार समोर आले आहेत.

१५ सप्टेंबर २०२६ रोजी तहसील कार्यालय, पारशिवनी येथे ही सोडत घेण्यात आली. या सोडतीत अजा-१, विजा-(अ) -१, भज -(ड)-१, भज -क -१, OBC-१, विमाप्र-२, इडब्लुएस -१ असे आरक्षण जाहीर करण्यात आले. यामध्ये भज -ब प्रवर्गाला शून्य जागा दाखवण्यात आली आहे.तर दोन साजाचे आरक्षण दाखविले नाही.

**महाराष्ट्र ढिवर समाज उ संघाचा सवाल - भज-ब चा अनुशेष कुठे गेला?**

तालुक्यात भज ब प्रवर्ग मोठ्या प्रमाणात आहे. आरक्षित केलेल्या प्रवर्ग संख्या अत्यल्प आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार भज-( ब ) ला २.५% आरक्षण आहे. १०० बिंदू नामावलीत भज(ब) साठी राखीव बिंदू असतानाही १० जागांमध्ये एकही जागा न देणे म्हणजे भज(ब) समाजावर उघड अन्याय आहे. तालुक्याच्या एकूण मंजूर पदांची १०० बिंदू नामावलीच जाहीर केली नाही. भज(ब) चा अनुशेष किती आणि तो कसा भरला, हे लपवण्यात आले आहे, असा आरोप महाराष्ट्र ढिवर समाज कल्याण संघाचे अध्यक्ष ईश्वर महादेव खंगार यांनी केला आहे.

**चिठ्ठी पद्धतीने आरक्षण हा शासन निर्णयाचा भंग**

इतिवृत्तात "गावाची चिठ्ठी प्लास्टिक डब्यात टाकून चिठ्ठी काढण्यात आली" असे नमूद आहे. महसूल व वन विभाग, मुंबई यांच्या दि. १९ ऑगस्ट २०२५ च्या पत्रानुसार कोतवाल भरती ही केवळ १०० बिंदू नामावलीच्या क्रमानुसारच झाली पाहिजे. चिठ्ठी पद्धत ही बेकायदेशीर आहे.

**विमाप्रला २०% आरक्षण कसे?**

विशेष मागास प्रवर्गाचे आरक्षण फक्त २% असताना १० जागांपैकी २ जागा म्हणजे २०% आरक्षण देण्यात आले आहे, जे १०० बिंदू नामावलीच्या प्रमाणापेक्षा कितीतरी जास्त आहे.

**मागण्या**

अ) मागासवर्ग कक्षाकडून प्रमाणित संपूर्ण १०० बिंदू नामावली जाहीर करावी.

ब) भज(ब) चा अनुशेष स्पष्ट करून आरक्षण दुरुस्त करावे.

क) तोपर्यंत कोतवाल भरती प्रक्रियेला तात्काळ स्थगिती द्यावी. याबाबतीत नीवेदन तहसीलदार पारशिवनी यांना दिले तर या निवेदनाच्या प्रती विभागीय आयुक्त नागपूर, जिल्हाधिकारी नागपूर आणि उपविभागीय अधिकारी रामटेक यांना पाठवण्यात आल्या आहेत. जर आरक्षण दुरुस्त न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र ढिवर समाज कल्याण संघाने दिला आहे.

यावेळी निवेदन देताना महाराष्ट्र ढिवर समाज कल्याण संघाचे अध्यक्ष ईश्वर खंगार यांच्या नेतृत्वात ढिवर समाज सेवा संघटनेचे अध्यक्ष सुतेश मारबते,निषाद पार्टीचे नेते मनोज बावणे, संघाचे तालुका अध्यक्ष बाळा खंडाटे, वासुदेव खंडाटे, शेषराव शिवारे, राजू केळवदे, निकेश केळवदे, अनिल नागपुरे, प्रभाकर केळवदे, कैलास बावणे,सागर बावणे उपस्थित होते. निवेदन नायब तहसिलदार डी.डी.कुंभारे यांनी स्विकारले.

> समाज कल्याण समितीचे मार्गदर्शन नुसार भज (ब) साठी आरक्षित जागा रिक्त नाहीत. त्यामुळे भज(ब) प्रवर्गाचे आरक्षण तालुक्यात निश्चित केले नाही.
> **- सुरेश वाघचौरे, तहसीलदार, पारशिवनी**

## कवितेच्या शब्दफुलांनी उमरेडमध्ये रंगले साहित्यिक विश्व

### तारांगण आर्ट्सतर्फे 'कवितेची कार्यशाळा व कविसंमेलन' उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**



शब्दांना भावनेची साथ लाभली, विचारांना काव्याची झालर चढली आणि रसिकांच्या दादेने उमरेडमधील साहित्यविश्व अक्षरशः बहरून गेले. तारांगण आर्ट्स यांच्या वतीने साहित्यप्रेमी, कवी आणि रसिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'कवितेची कार्यशाळा व कविसंमेलन' या विशेष साहित्यिक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जीवन विकास विद्यालय, उमरेड येथे झालेल्या या उपक्रमात कवितेच्या लेखन प्रक्रियेपासून काव्यदृष्टी, अभिव्यक्ती आणि साहित्यिक जाणिवांपर्यंत विविध पैलूंवर मार्गदर्शन करण्यात आले. नवोदित कवींना लेखनाची नवी दिशा देतानाच, अनुभवी कवींनाही आपल्या काव्यप्रवासाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची संधी या कार्यशाळेत मिळाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक डॉ. प्रशांत राऊत होते. नागपूरचे ज्येष्ठ काव्यसमीक्षक व मुद्रितशोधक दीपक रंगारी यांनी मार्गदर्शकाची भूमिका बजावली. कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी नागपूरचे सुप्रसिद्ध कवी संजय गोडघाटे, तर प्रमुख अतिथी म्हणून उमरेडचे कविवर्य प्रमोद गोंडाणे उपस्थित होते.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन चंद्रपूरच्या कवयित्री वैशाली रामटेके यांनी केले. तारांगण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा नाट्यकर्मी, गीतकार संजय बन्सल यांनी प्रास्ताविकातून उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. मार्गदर्शकांचा परिचय विजयानंद सावळे यांनी करून दिला, तर गायत्री वरंभे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात रंगलेल्या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन ब्रह्मपुरीचे कवी मंगेश जनबंधु यांनी केले. वडसा, ब्रह्मपुरी, भिवापूर, चंद्रपूर, उमरेड, बुटीबोरी, नागपूर, वेलतूर, कुही आणि भंडारा आदी विविध भागांतून आलेल्या तब्बल ५० कवींनी आपल्या दर्जेदार काव्यरचना सादर करून संमेलनाला वैविध्यपूर्ण आणि साहित्यिक उंची प्राप्त करून दिली. कधी प्रेमभावनेचा ओलावा, कधी सामाजिक वास्तवाचे भान, कधी नात्यांची हळवी किनार तर कधी परिवर्तनाची हाक अशा विविध भावछटांनी कवितांचा आस्वाद घेताना रसिक मंत्रमुग्ध झाले. प्रत्येक काव्यरचनेनंतर उमटणारी रसिकांची दाद आणि टाळ्यांचा कडकडाट यामुळे संमेलनाला विशेष रंगत आली. सहभागी सर्व कवींना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. दोन्ही सत्रांना दर्दी रसिकांची लक्षणीय उपस्थिती लाभली.

या साहित्यिक उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रीना गायकवाड, उमेश बोरकर, हरिश श्यामकुवर, वीरेंद्र मेश्राम, विठू इरपाते, जितेंद्र नगराळे तसेच तारांगण आणि विचार मंथन समूहाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. उमरेडच्या साहित्यिक अवकाशात शब्दांचा हा सुरेल मेळावा रसिकांच्या मनात दीर्घकाळ स्मरणात राहणारा ठरला.

## निर्विघ्न विसर्जनासाठी महावितरण सज्ज, 'सुरक्षा प्रथम' बाळगण्याचे आवाहन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी नागपूर शहर सज्ज झाले आहे. अनंत चतुर्दशीला ढोल-ताशांच्या गजरात आणि "गणपती बाप्पा मोरया" च्या जयघोषात विसर्जन पार पडेल. विसर्जन सोहळा सुरळीत आणि सुरक्षित व्हावा, यासाठी महावितरणने कंबर कसली आहे. महापालिकेने शहरात २२५ ठिकाणी तब्बल ४४७ कृत्रिम कुंड तयार केले असून, या सर्व भागांत अखंड वीजपुरवठा चालू ठेवण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. विसर्जन मिरवणुकीचे मुख्य मार्ग आणि विसर्जन स्थळांची पाहणी महावितरणच्या टीमने आधीच पूर्ण केली आहे. रस्त्यावरील विद्युत यंत्रणेची डागडुजी करण्यात आली असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून अधिकारी व कर्मचारी विसर्जन संपेपर्यंत प्रत्यक्ष मैदानावर उपस्थित राहणार आहेत.

उत्सवाच्या या उत्साहात विद्युत अपघात टळावेत, यासाठी महावितरणने नागरिक आणि गणेशोत्सव मंडळांसाठी काही साध्या पण महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत. विसर्जनाला निघण्यापूर्वी मिरवणूक मार्ग व्यवस्थित तपासून घ्या. रस्त्यावरील विजेचे खांब, लोंबकळणाऱ्या तारा आणि ट्रान्सफॉर्मरची माहिती ठेवा. विजेच्या तारांना स्पर्श होणार नाही अशा योग्य उंचीच्या वाहनांचाच वापर करा. मंडप व मिरवणुकीतील सजावटीसाठी केवळ आयएसआय मार्क असलेल्या चांगल्या दर्जाच्या वायर्स आणि उपकरणांचा वापर करा. उघड्या वायर्स किंवा कच्चे जोड धोक्याचे ठरू शकतात. जनरेटर व बॅटरी सुरक्षित ठिकाणी ठेवा आणि ओल्या जागेवर विजेची उपकरणे वापरणे पूर्णपणे टाळा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# भूस्खलनाने हादरलेल्या नेपाळात, नागपुरात हरवलेल्या खडकासला सापडली घराची वाट!

## जखमी अवस्थेत मृत्यूच्या विचारापर्यंत पोहोचलेल्या नेपाळी नागरिकाला आस्था निवारागृहाने दिले नवे जीवन, अथक प्रयत्नांतून झाले परिवार मिलन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



एका अनोळखी शहरात, पायाला जखमा, डोक्यावर छप्पर नाही, पोटात अन्नाचा घास नाही, आणि मनात फक्त निराशा! आता मला जगायचे नाही. या विचारापर्यंत पोहोचलेल्या एका नेपाळी नागरिकाच्या आयुष्यात मात्र माणुसकीचा एक हात पुढे आला आणि त्याची हरवलेली जीवनाची वाट पुन्हा सापडली. नागपूर महानगरपालिकाद्वारे संचालित आस्था निवारागृह, पोलीस सामाजिक सुरक्षा दल आणि संबंधित यंत्रणांच्या अथक प्रयत्नांतून खडकास अर्कबहादुर लिम्बू, रा. नेपाळ यांचे त्यांच्या परिवाराशी भावनिक पुनर्मिलन करण्यात यश आले.

हा प्रसंग आणखी हृदयस्पर्शी ठरतो, कारण याच काळात नेपाळमध्ये २६ ऑगस्ट रोजी झालेल्या मोठ्या हिमनदी-खडक दुर्घटनेनंतर पूर, चिखल आणि भूस्खलनामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून हजारो लोकांच्या आयुष्यावर संकट कोसळले आहे. अधिकृत आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थांच्या माहितीनुसार या दुर्घटनेमुळे मोठ्या प्रमाणावर जीवितहानी, बेपत्ता व्यक्ती आणि विस्थापन झाले. अशा वेदनादायी वातावरणात, नागपूरमध्ये हरवलेल्या एका नेपाळी व्यक्तीला पुन्हा त्याच्या परिवारापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न माणुसकीच्या नात्याला अधोरेखित करणारा ठरला.

**रेल्वेच्या एका थांब्याने बदलले आयुष्य...**

रोजगाराच्या शोधात खडकास लिम्बू आपल्या सोबत्यांसोबत सिकंदराबाद येथे कामासाठी रेल्वेने जात होते. नागपूर रेल्वे स्थानकावर रेल्वे थांबली असताना त्यांना अचानक लघुशंकेची तीव्र इच्छा झाली. ते रेल्वेतून खाली उतरले; मात्र काही क्षणांतच रेल्वे सुरू झाली.

सोबती आणि रेल्वे दोन्ही निघून जात असल्याचे पाहून ते घाबरले. काय करावे हे सुचेना. त्यांनी रेल्वेच्या मागे धावण्याचा प्रयत्न केला. त्या धावपळीत त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. आणि त्यानंतर सुरू झाला एका माणसाच्या जगण्याचा संघर्ष. अनोळखी नागपूर शहरात जखमी पायांनी ते दिवस काढू लागले. ना राहण्यासाठी जागा, ना पोटासाठी अन्न आणि ना जवळचे कोणी माणूस. उन्हाची तीव्रता, भूक आणि वेदना यामुळे त्यांची मानसिक स्थितीही ढासळत गेली. शेवटी परिस्थिती इतकी असह्य झाली की त्यांच्या मनात आता जीवन संपवावे, असे विचार येऊ लागले.

**मृत्यूच्या विचारातून जीवनाच्या वाटेवर...**

याच काळात उष्माघात प्रतिबंधाच्या अनुषंगाने राबविण्यात आलेल्या मिशन मुक्ती मोहिमेदरम्यान पोलीस सामाजिक सुरक्षा दल आणि नागपूर महानगरपालिका द्वारे संचालित आस्था निवारागृहाची टीम त्यांच्या मदतीला धावून आली. बेवारस आणि अस्वस्थ अवस्थेत असलेल्या खडकास लिम्बू यांना आस्था निवारागृहात दाखल करण्यात आले. त्यांच्या दोन्ही तळपायांना जखमा असल्यामुळे त्यांना चालताही येत नव्हते. मात्र निवारागृहातील कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडे केवळ एक लाभार्थी म्हणून पाहिले नाही; तर एका हरवलेल्या माणसाप्रमाणे त्यांची काळजी घेतली. उपचार झाले. औषधे मिळाली. जखमांवर मलमपट्टी झाली. समुपदेशन झाले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांना पुन्हा आपण एकटे नाही, याची जाणीव करून देण्यात आली. हळूहळू त्यांच्या पायांमध्ये ताकद आली. मनातील निराशा कमी झाली. आणि एक दिवस ते पुन्हा स्वतःच्या पायावर उभे राहिले.

**फेसबुकच्या माध्यमातून सुरू झाला परिवाराचा शोध**

उपचार आणि समुपदेशनादरम्यान त्यांच्या परिवाराचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. फेसबुकच्या माध्यमातून त्यांच्या मित्राची आयडी शोधण्यात आली. त्यातून मिळालेल्या



तुटपुंज्या माहितीच्या आधारे घरचा संपर्क क्रमांक मिळविण्यात आला. मात्र अनोळखी व्यक्तीचा अचानक आलेला संपर्क असल्याने परिवारातील सदस्यांना सुरुवातीला विश्वास बसत नव्हता. तरीही आस्था निवारागृहाच्या टीमने प्रयत्न सोडले नाहीत. अजनी पोलीस स्टेशनच्या मिसिंग विभागातील रूखसार मॅडम यांच्या मदतीने नेपाळमध्ये संपर्क साधण्यात आला. संपर्काचे प्रयत्न, माहितीची पडताळणी आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू राहिला.

**शेवटी तो क्षण आला, आपला माणूस सापडला**

दीर्घ प्रतीक्षेनंतर खडकास लिम्बू यांचा त्यांच्या परिवाराशी संपर्क झाला आणि परिवार मिलनाचा मार्ग मोकळा झाला. ज्याच्या डोळ्यांसमोर काही दिवसांपूर्वी मृत्यूचे विचार होते, त्याच डोळ्यांत आता आपल्या माणसांना भेटण्याचा आनंद होता. नागपूरच्या रस्त्यावर हरवलेला एक जीव पुन्हा आपल्या घराच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचला. नेपाळमधील नैसर्गिक आपत्तीने अनेक कुटुंबांना वेदना दिलेल्या असताना, एका नेपाळी कुटुंबाला मात्र नागपुरातून त्यांच्या माणसाच्या परतीची आनंदाची बातमी मिळाली. ही घटना सीमा, भाषा आणि देश यांच्या पलीकडे जाणाऱ्या माणुसकीच्या नात्याची जिवंत साक्ष ठरली.

**पुनर्वसन म्हणजे फक्त आसरा नाही!**

खडकास लिम्बू यांची कहाणी सांगून जाते की, निवारागृह म्हणजे केवळ चार भिंतींचा आसरा नाही. एखाद्याच्या आयुष्यातील हरवलेली आशा परत आणणे, त्याला उपचार देणे, मानसिक आधार देणे आणि शेवटी त्याला त्याच्या परिवाराच्या कुशीत पोहोचविणे, हेच खऱ्या अर्थाने पुनर्वसन आहे. या परिवार मिलनासाठी आस्था निवारागृहाचे संचालक दीपक पसारकर, वॉर्डन गौतम अशोकजी नागरे, व्यवस्थापक वैभव बागडे, समाजसेवक तुषार हुकरे, काळजीवाहक कार्तिक कोडवते व अनंता नागोसे, डॉ. अमिषा, समुपदेशक संजना मडकाम, परिचारिका योगिता भुमरकर आणि इतर कर्मचारी तसेच सामाजिक सुरक्षा दलाचे अरक संजय सोनवणे, ढरकदिपक झाडे सर लता गवई गणेशपेठ पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले. एका माणसाला रस्त्यावरून उचलून निवारागृहात आणणे ही मदत होती; पण त्याला पुन्हा आपल्या माणसांच्या कुशीत पोहोचविणे, ही खरी माणुसकी होती.